# प्रकरण दुसरे

## शेतकरी कामगार पक्ष आणि वैचारिक आधार

२.१ आंतरराष्ट्रीय परिस्थिती.

२.२ राष्ट्रीय परिस्थिती.

२.३ हिंदी कम्युनिस्ट पक्ष पुढारपणाच्या घोडचुका

२.४ समाजवादी पक्षाचे सत्य स्वरूप

२.५. शेतकरी कामगार पक्षाचा जन्म व कार्य

२.६ पक्षाचे पुढील कार्य

२.७ पक्षाच्या कामाची पध्दत

कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रमुख घटक विचारसरणी हा मानला जातो. एखाद्या विशिष्ट विचारसरणीवर तो आपले अस्तित्व अबाधित राखण्याचा प्रयत्न करत असतो. जनमानसात त्या विचारसरणीला लोकप्रियता मिळाली तर झपाट्याने पक्ष वाढतो व अपल्या वैचारिकतेवर भर देऊन कार्य करित राहतो. निवडणूकीतील विजयानंतर तो पक्ष वैचारिकतेला अनुसरून वचनबध्द असला पाहिजे या जाणीवेतूनच चीन मध्ये झालेल्याच मार्क्सवाद-लेनिनवाद जगात प्रखरतेने पुढे येत होता. शेतकऱ्याचे कामगारांचे राज्य निर्माण करण्यासाठी मार्क्स-लेनिनवाद अधिक प्रभावी असल्याची त्यांची भावना होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्यापूर्वीच्या चळवळींचा आधार घेत समाजवादाची चाहूल लागलेली होती त्यामुळे पक्षावर होणाऱ्या ब्राम्हणेत्तरांचा आरोप झटकून टाकून मार्क्स-लेनिनवादाच्या आधारे ज्या कारणासाठी काँग्रेसमधून बाहेर पडलो त्यासाठी आवश्यकता शे.का.पक्षाच्या नेत्यात वाढलेली होती.

याची जाणीव शंकरराव मोरे या नां झाल्याने ते आपले मत मांडतात की शेतकरी कामगार पक्ष स्थापन झाल्यानंतर आपण मार्क्सवादाकडे वळलो. कम्युनिस्टांनी राष्टीय चळवळीला विरोध केल्याने मार्क्सवादाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. संघाची स्थापना झाल्यानंतर केलेला जातीयतेचा आरोप खोडून काढताना शंकरराव मोरे यांनी काँग्रेसच्या संयुक्त आघाडी फुटून आर्थिक व सामाजिक कार्यक्रमांच्या आधारे निरनिराळे वर्गीय पक्ष निर्माण होण्याची आणि काँग्रेस भांडवल धार्जिण्या वर्गसमन्वयी धोरणा विरुध्द वर्ग लढ्याची भूमिका घेऊन शेतकरी-कामगारांनी उभे राहण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले होते. २ ऑगस्ट १९४७ रोजी आळंदी येथे संघाच्या बैठकीच्या निमंत्रण पत्रिकेत समाजवादी तत्वाचा अंगिकारकून सर्व प्रकारच्या समतेवर अधिष्ठित झालेली समाजरचना अस्तित्वात आली पाहिजे हे स्पष्टपणे नमुद केले होते. व त्यास बैठकीत मान्यताही दिली होती. संघाच्या घटनेत शेतकरी-कामकरी यांचे राज्य स्थापन करण्यासाठी समाजसत्तावादाचा अंगिकार करून आर्थिक,सामाजिक, राजकीय समतेवर आधारलेली नवी समाज रचना अस्तित्वात आणण्याची सर्व तऱ्हेने प्रयत्न करणे घटनेबरोबरच आंळदीच्या बैठकीत प्रसूत करण्यात

आलेल्या कार्यक्रमातही समाजवादी विचारणीचा पुरस्कार आढळतो. श्रमजीवींच्या शेतकरी-कामगारी राज्याची उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण करून आणि समाजवादी विचारसरणीनुसार क्रांतीकारक पध्दतीने समाजरचना बदलून त्रिविध समता निर्माण करावी लागते. असे सांगून समाजवादी समाजरचनेची मुलतत्त्वे कार्यक्रमात अंतर्भूत केलेली होती.१

२३.८.४७ च्या म.प्रां. कॉंगेस कमिटीच्या सभेतही श्री.शंकरराव गोरे यांनी कॉंगेसचे भवितव्य यासंबंधीच्या ठरावात समाजवादी लोकशाहीची खालीलप्रमाणे मूलभूत तत्त्वे सांगितली.

१) देशातील राजसत्ता ही श्रमजीवी वर्गाचेच हाती असली पाहिजे व त्यांचेच हिताकडे पाहून त्या सत्तेचा सतत उपयोग झाला पाहिजे.

२) उत्पादनांची साधने ही मूठभर लोकांच्या मालकीची असली तरी हे मुठभर लोक, कारखानदार व जमीनदार ह्या साधनांचा उपयोग श्रमजीवी वर्गाची पिळवणूकीसाठीच करतात. तरी या साधनांचा असा दुरउपयोग होऊ नये म्हणून ही साधने म्हणजे जमिनी व कारखाने राष्ट्राच्या मालकीचे झाले पाहिजेत.

३) कारखाने राष्ट्राच्या मालकीचे केल्यानंतर त्या कारखान्यातील वर्ग जागृत कामगारांचे हुकमतीखाली ते चालवून , केवळ उपयोगासाठी माल तयार करण्यात येईल व सर्व श्रमजीवी जनतेच्या गरजा भागविण्यासाठी मालाचे उत्पादन तशा प्रकारे करण्यात येईल. याच तत्वावर देशात ठिकठिकाणी नवीन कारखाने काढून देशाचे औद्योगिकीकरण झाले पाहिजे.

४) जमीनदार, इनामदार, सरंजामदार व इतर ऐतखाऊ यांची जमीन राष्ट्राच्या मालकीची केल्यानंतर ती जमीन प्रत्यक्ष शेतीत खपणाऱ्या शेतकरी वर्गाचे सामुदायिक हुकमतीखाली आणून सरकारी पध्दतीने व आधुनिक सुधारणांचा उपयोग करून शास्त्रीय पध्दतीने वाहिवाटली जावी व जमीन वाहिवाटून जी पैदास होईल त्याचा फायदा प्रत्येकाला भरपूर व सकस अन्न देण्यासाठी करण्यात येईल.

५) सर्व मुला-मुलींना सक्तीचे मोफत शिक्षण देऊन त्यांच्या शारिरिक, मानसिक व बौध्दीक विकासाची तरतूद करण्यात आली पाहिजे.

६) वाहतुकीची सर्व साधने ही राष्ट्राच्या मालकीची झाली पाहिजेत.

७) सर्व तरूण स्त्री-पुरूषांना योग्य असे लष्करी शिक्षण सक्तीने देऊन स्वतःचे व देशाचे सरंक्षणासाठी त्यांना समर्थ बनविण्यात आले पाहिजे.

८) सवांना पोटभर व सकस अन्न, अंगभर कपडे व राहण्यास योग्य असे निवासस्थान पुरविण्याची हमी राज्यसंस्थेने दिली पाहिजे.

९) देशात निर्माण होणाऱ्या व बाहेरून येणाऱ्या मालाचे वाटप खाजगी व्यक्तींच्या हातात न ठेवता ते सहकारी संस्थाकडे सोपविण्यात आले पाहिजे.

१०) सामाजिक समतेच्या तत्वाप्रमाणे कोणीही स्त्री अगर पुरुष जन्मामुळे, कर्मामुळे अगर धंद्यामुळे श्रेष्ठ अगर कनिष्ठ मानला जाणार नाही २

कॉंग्रेसने आपल्या सुचनांकडे दुर्लक्ष केल्याने व उजव्या गटांच्या प्रभावामुळे कॉंग्रेस तिच्या पासून सोडविण्यात असमर्थ ठरल्यामुळे कॉंग्रेस सोडून बाहेर पडलो अशी भुमिका जेधे-मोरे गटाने घेतली होती. कॉंग्रेस बरोबर झालेला पक्षातंर्गत संघर्ष म्हणजे वर्गसंघर्ष होता. कॉंग्रेसने उपपक्षाला बंदी घातल्यामुळे शेतकरी कामगार पक्ष एक स्वतंत्र पक्ष अस्तित्वात आला व मार्क्सवादी विचार घेऊन उभा राहिला. पण प्रत्यक्षात मार्क्सवादाचे विचार कोठेही आढळले नाहीत. पक्षाची घटना व त्यातील तरतुदी व्यवहारात अस्तित्वात आल्या नाहीत. कॉंग्रेसचा त्याग का केला याची कारणे सुरवातीच्या भागात दिलेली आहेत. त्यावरून नेत्यांवर मार्क्सवादाचा व समाजवादाचा प्रभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे पक्षावर घेतलेला आक्षेप हा पक्ष या विचारापासून दूर आहे हेही लक्षात येते.

अहंकारातच कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर त्यांनी कोणत्याही आखिल भारतीय डाव्या पक्षात विसर्जित न करता आपल्या प्रांतापुरता सवतासुभा उभा केला. वास्तविक विचाराची व कार्याची स्वतंत्र परंपरा असलेला समाजवाद पक्ष हा शे.का.पच्या पूर्वसंचिताशी सुसंवादवादी व अपेक्षित क्रांतिकारी बदलाच्या दृष्टीने समविचारी असा पक्ष होता. अनेक अर्थांनी तो शे.का.पचा सहोदर होता पण विचार व व्यवहार यामधील ओढाताण तशीच

राहिली. सोलापूर येथे झालेल्या पहिल्या अधिवेशनात एक ठराव पास केला होता की भारताची घटना समिती ही भांडवलदार, बुध्दीवादी व प्रतिगामी यांची प्रातिनिधीक असून घटनेचा मसुदा हा साहजिकच भांडवलदार व त्यांचे हस्तक यांची सत्ता चिरंतन करणारा असा आहे. त्या घटनेद्वारे किसान-कामगारांचे राज्य येण्याची सुतराम शक्यता नाही, घटनेत काही बदल व्हावेत अशी मागणीही या ठरावाने केली होती. व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित रहावे, उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची असावीत आणि ते शक्य नसल्यास सर्व उत्पादने, साधने व अन्य खाजगी मिळकत मोबदला न देता राष्ट्राच्या मालकीची करण्याचा हक्क कायदेमंडळास द्यावा. सत्ता दृष्टिक्षेपात असल्यामुळे पक्ष पुढाऱ्यांच्या अग्रक्रमामध्ये क्रांतीकार्याला गौणत्व आल्याचे निदर्शक आहे. सोलापूर अधिवेशनात सादर केलेल्या अहवालात शंकररावांनी मान्य केले आहे की, कार्यकर्त्यांमध्ये प्रामाणिकपणा व कामाची उभारी पूरेपूर असली तरी सलग दृष्टीकोन व विचारांची खंबीर बैठक नाही. ३

भारतामध्ये कोणत्याही पक्षाची वैचारिकता कोणतीही असली तरी कोणताही पक्ष जातीयतेच्या बाहेर पडलेला नाही. पाश्चिमात्य देशातही त्याचे प्रत्यंतर येते. स्वातंत्र्याच्या लढाईसाठी ऐक्य निर्माण होण्यासाठी कोणत्याही गटांनी, संघटनांनी वर्गभेदाला महत्त्व न देण्याचे पुढाऱ्यांनी ठरवले होते. परंतु स्वातंत्र्यानंतर वर्गभेदाचा उपयोग करून सार्वत्रिक निवडणूका सर्वच पक्षांनी लढवल्या. त्यात शेतकरी कामगार पक्षाचाही समावेश होताच. आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणूक कामाला अधिक महत्त्व देऊ नका असेही म्हटंले होते. तरीही पुढाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या दबावामुळे शेतकरी कामगार पक्षाने प्रत्यक्षात निवडणुकीत या घटकाला महत्त्व दिल्याने संसद, विधानसभांच्या बाहेर मार्क्सवादाच्या विचारांची पायाभरणी रचनात्मक दृष्टीने करू शकला नाही. शे.का.पच्या नेत्यांनी फक्त मार्क्सवादाचे विचार मांडले परंतु प्रत्यक्षात कृती करू शकले नाहीत.

## शेतकरी कामगार पक्षाचे दुसरे अधिवेशन

शेतकरी कामगार पक्षाचे दुसरे अधिवेशन मे. १९५० रोजी दाभाडी येथे भरले. पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात दाभाडी प्रबंध मांडला. या अधिवेशनातच मार्क्सवाद व लेनिनवादाचा विचार पक्षाने स्पष्टपणे मांडला. प्रबंधावर अनेकांनी टीका केली होती, परंतु

आळंदीच्या बैठकीपासून मार्क्सवाद-लेनिनवाद या वळणावर वाटचाल पक्षाने केली होती. याचवेळी प्रबंध स्वीकारण्याचे का ठरवण्यात आले याबद्दल बी.डी.किल्लेदार म्हणतात, निवडणूकदृष्ट्या पहाता प्रबंध मारकच होता. कारण त्यातून पक्षाची कम्युनिस्ट सहप्रवासी म्हणजेच राष्ट्रद्रोही अशी प्रतिमा उभी राहण्याचा धोका होता. त्यांच्यामध्ये वैचारिक भूमिका स्पष्ट करणे, पक्षाला जातीय ठरवू पाहणाऱ्या टीकाकारांना ठोस उत्तर देणे, कार्यकर्त्यांना निश्चीत दिशा देणे ह्याच प्रबंधामागील प्रेरणा होत्या. विशेषःत मार्क्सवादी पक्षाची भूमिका ही अधिकृत प्रबंधाच्या रूपाने पुढे येत असते. एस.के.लिमये म्हणतात आपला पक्ष मार्क्सवादी आहे तेव्हा आपला एक प्रबंध असला पाहिजे हीच प्रेरणा इतर सगळ्यांपेक्षा बलवत्तर ठरली असावी असे वाटते. बहुसंख्य कार्यकर्त्यांना मार्क्सवादांचे आकर्षण वाटू लागले होते. चीनमध्ये शेतकऱ्यांची क्रांती यशस्वी होत असल्यामुळे आपणही त्याच धर्तीवर यादेशात क्रांती घडवून आणू अशी महत्त्वाकांक्षा अनेकांच्या मनात निर्माण झाली होती. विशेषतः सातारा चळवळीतला जो घटक शेतकरी कामगार पक्षामध्ये आला होता त्याला स्वतःचे चीनमधील चळवळिशी साधर्म्य जाणवत होते. शेतकरी समाजानेच चीनची क्रांती यशस्वी केली असा त्यांचा समज झाला होता. आणि त्यातूनच दाभाडी प्रबंधाच्या निर्मितीस चालना मिळाली होती.

राष्ट्रीय लढ्यात कम्युनिस्ट पक्षाने विरोधी भुमिका घेतल्याने त्यांची प्रतिमा जनतेत उजळलेली होती व सरकारच्या धोरणाने कम्युनिस्ट दुबळा झालेला होता. त्यामुळे आंतराष्ट्रीय कम्युनिस्टांच्या पाठबळाखाली मिळवून उभे राहण्याच्या प्रयत्नात आपलीही मार्क्स-लेनिनवादीची प्रतिमा वाढेल असा विचार पक्षाच्या नेत्यात आला असावा. दाभाडी प्रबंधाचा शे.का.प च्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. या प्रबंधांतच शेतकरी कामगार पक्षाचा वैचारिक आधार स्पष्ट होता. या प्रबंधात आंतराष्ट्रीय परिस्थिती , हिंदी कम्युनिस्ट पक्ष पुढारीपणाच्या घोडचूका, शेतकरी कामगार पक्षाचा जन्म व कार्य , समाजवादी पक्षाचे खरे स्वरूप, पक्षाचे पुढील कार्य पक्षाच्या कामाची पध्दत या प्रकरणातून स्पष्ट होते. त्यामुळे त्याचा सविस्तर आढावा घेणे क्रमप्राप्त बनते.

## २.१ आंतराष्ट्रीय परिस्थिती

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतरच्या काळात आंतराष्ट्रीय परिस्थितीमध्ये फेरबदल झाले. साम्राज्यवादी गट (अमेरिका) व साम्राज्यशाही विरोधी गट (रशिया) गट परस्पर विरोधी लढत होते या परिस्थितीत भांडवलशाही नष्ट होत चालली असून त्यामुळे साम्राज्यशाही गटाची शक्ती कमजोर होत चालली होती तर समाज सत्तावादी व लोकशाही गटाची शक्ती वाढत चालली होती. साम्राज्यशाहीविरोधी लोकशाही गटाचे पुढारपण रशिया करत होती तर त्यामध्ये पूर्व युरोपातील लोकशाही राष्ट्रे चीन व सर्व देशातील क्रांतिकारी जनता होती. त्याचे उद्दिष्ट लोकशाहीसाठी व शांततेसाठी साम्राज्यवादी गटाच्या विरुध्द लढा देणे होते. आणि लोकशाही विरोधी साम्राज्यवादी गटात अमेरिकेच्या पुढारपणाखाली इंग्लंड, फ्रान्स.इटली, व इतर देशातील पिळवणूक करणारे गट होते. याचा उद्देश लोकशाही नष्ट करून नवे जागतिक युध्द पेटवणे हा होता.

### साम्राज्यवादी गट

लोकशाही विरोधासाठीच्या युध्दात लागणारा कच्चा माल व साधनासामुगी बळकावण्याचा अमेरिकेचा प्रयत्न चालला होता. व राजकीय व आर्थिक व लष्करी दबदबा वाढवून साम्राज्यशाही प्रभाव विस्तार अमेरिका वाढवू पाहत होता. हा गट स्पेनमध्ये फ्रॅंको, ग्रीसमध्ये राजेशाही फॅसिस्ट, चीनमध्ये चॅंग-कै-शेक व्हिएटनाममध्ये बाओदाई यांना सहाय्य करत होता. आणि इतर देशातील लोकशाही प्रस्थापित झालेल्या विरोधी गटाला (पिळवणूक करणारा गट) हेरांना उचलून धरत होता व त्यातूनच जर्मनीची फाळणी केली. मार्शल योजना ही अमेरिकेच्या युध्दखोर धोरणाचा एक महत्वाचा भाग असून या योजनेचा खरा उद्देश युरोपातील राष्ट्रांना आर्थिक पुर्नघटनेकरिता मदत करणे हा नसून युरोपवर अमेरिकेची आर्थिक व राजकीय गुलामगिरी लादणे हे आहे.मार्शल योजना हे अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे आर्थिक लष्करी व राजकीय हत्यार आहे. व त्याच्या सहाय्याने ते पश्चिम युरोपची अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात घेऊन पश्चिम युरोपला आपली वसाहत बनविण्याचा प्रयत्न करत आहेत. ब्रिटीश अमेरिकन साम्राज्यवादी गट हा पश्चिम संघ, उत्तर अंटलांटिक गट व त्याचे पूरक असे भूमध्य करार, मध्यपूर्व करार, आग्नेय आशिया करार, अतिपूर्व

पॅसिफिक गट अरब राष्टांचा गट वगैरे मार्गाने आपले युध्दखोर धोरण पुढे नेत आहे. तो समग्र मानव जातील धोका आहे.

सोव्हिएट रशिया जनतेची लोकशाही सरकारे प्रस्थापित झालेली राष्ट्रे व इतर देशात सहकार्य निर्माण होऊ नये आणि देशादेशात शांतता नांदू नये म्हणून ब्रिटीश अमेरिकन गट संयुक्त राष्ट्रसंघटनेला सुरंग लावत आहे. युध्दाची तयारी करताना भांडवलदारी मक्तेदार युध्दखोरांना जनतेला युध्द हवे की नको याची दखल न घेता श्रमजीवी जनतेवर कामवाढ, वेतनकपात, बेकारी, वाढती महागाई इ.स्वरूपात हल्ले चढवत आहे. लष्करी व व्यूहरचनात्मक उपाय, राजकीय दडपण,आर्थिक वर्चस्व , जनतेला गुलाम बनविणे हे मार्ग अवलंब करून युध्द पेटविण्याचा प्रयत्न होता. साम्राज्यवादी युध्दखोर गट लष्करी तयारी करत असला तरी त्याची ताकद वाढली नसून ती कमीच होत होती. साम्राज्यवादी गटांतील अंतर्गत व बाह्य विरोध होत असून तो गट आर्थिक आरिष्ट्याच्या भयंकर चक्रात सापडला होता. त्या वाढत्या आरिष्टाबरोबरच भांडवलशाही देशांतील जनेतच्या चळवळीचा जोरही वाढत आहे.

## सोव्हिएट गट

साम्राज्यशाही अमेरिका व इंग्लंडच्या गट युध्दाची तयारी त्यांची चालु असतानाच व लोकशाही देशातील विरोधी गटांना साह्य करण्याचा प्रयत्न करीत असताना साम्राज्यशाही विरोधी रशियाचा गट साम्राज्यवाद्यांचे प्रयत्न हाणून पाडताना या गटाची एकजूट होत होती. त्यांचे प्रयत्न खंबीरपणे चालू होते. महायुध्दातील आर्थिक हानी भरून काढण्यासाठी रशियाला बराच कालावधी लागेल हा साम्राज्यवाद्यांचा अंदाज फोल ठरला होता. सोव्हिएट युनियला अणुबॉबचा शोध लागल्याने अमेरिकेची ॲटम बॉबची मक्तेदारी नष्ट झाली होती. तरीही त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे अणुबॉब बंदीची मागणी केलेली होती. तर पोलंड झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, रुमानिया, हंगेरी, अल्बनिया या देशात लोकशाही सरकारे प्रस्थापत झाली. पूर्व जर्मनीत लोकशाही सरकार प्रस्थापित झाले. या देशातील जनता समाजसत्तावादी समाजरचना निर्माण करून तेथील आर्थिक व सांस्कृतिक प्रगती झपाट्याने झाली. त्यामुळे सोव्हिएट रशियाचे संबंध दृढ होऊन त्यांच्यात एकजूट निर्माण झाली.

शांततावादी सामाज्यशाही विरोधी गटांनी प्रचंड संघटना निर्माण केली. त्यामध्ये सामाज्यशाही विरोधी लाखो जनतेने भाग घेतला. या चळवळीत कामगार, शेतकरी, बुध्दजीवी, सामान्य नागरिक इ.जनता सामील झाली.

राष्ट्राचा विश्वासघात करून अमेरिकेचा हस्तक बनलेला चँग-कै- शेकची सत्ता चिनी जनतेने उखडून टाकून त्या ठिकाणी जनतेच्या लोकशाहीची प्रस्थापना केली. त्यामुळे नवा लोकसत्तावादी चीन सामाज्यशाही विरोधी मोर्चात सामील झाल्याने त्या सोव्हिएट गटाची ताकद वाढली.चीनमधील विजयामुळे वसाहतीच्या स्वातंत्र्य लढ्याच्या नव्या टप्प्याला आरंभ होऊन व्हिएटनाम, ब्रम्हदेश, इंडोनेशिया, द. कोरिया, फिलीपाईन्स या देशातही सामाज्यशाही विरोधी स्वातंत्र्य चळवळीचा लढा चालू होता. वसाहत देशात व परतंत्र देशात राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीने मिळालेला विजय व चालू लढ्याने सामाज्यशाही विरोधी शक्तीच्या ताकदीत वाढ झाली. हिंदी जनतेचा लोकशाहीसाठी लढाही याच चळवळीचा भाग होता.

आंतराष्ट्रीय परिस्थितीचा या घटकात पक्षाच्या दाभाडी प्रबंधात आढावा घेऊन दुसऱ्या महायुध्दानंतर सामाज्यवादी व समाजवादी असे दोन गट पडले. या शीतयुध्दात सामाज्यवाद्यांची ताकद कमी होऊन समाजवाद्यांची जनतेची लोकशाहीसाठीच्या लढ्यात वाढ झाली. हे प्रबंधात स्पष्ट केले आहे. ती परिस्थिती हिंदूस्थानात निर्माण होऊ लागली होती. हिंदूस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळी ही समाजवादी लोकशाही प्रत्यक्षात अस्तित्वात येण्यासाठी चालू होती. या चळवळीला आंतराष्ट्रीय चळवळीचाच एक भाग असे शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंधात उल्लेख केला आहे.

## २.२ राष्ट्रीय परिस्थिती

पहिल्या युध्दानंतर सर्व वसाहतिक व निमवसाहतिक राष्ट्रामध्ये सामाज्यशाहीच्या विरोधात लाट निर्माण झाली होती त्याला हिंदूस्थानही अपवाद नव्हता. या काळातरच हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीला जोर चढला, त्यामध्ये कामगार, शेतकरी, सामान्य वर्ग यांनी यामध्ये भाग घेतला. तर लष्कराचे बंड, शेतकऱ्यांचा उठाव, गिरणी कामगारांचा संप या

चळवळीचाच एक भाग होता. परंतु ही चळवळ असंघटित स्वरूपाची होती आणि तिचे नेतृत्व भांडवलदार वर्गाकडे होते.

पहिल्या महायुध्दाचा परिणाम असा झाला की हिंदूस्थानत औद्योगिकरणात थोडी वाढ होऊन हिंदी कामगार वर्गात वाढ झाली. १९१४ साली एकुण कामगारांची संख्या ९५१००० होती, ती १९९८ साली ११२३००० झाली. परंतु हा कामगार वर्ग असंघटित होता. किंवा त्याचा एक वेगळा पक्षही नव्हता. कामगारांच्या चळवळीनंतर क्रातींकारक साम्राज्यशाही विरोधी पुढारीपण प्रस्थापित करण्यासारखी भौतिक स्थिती अस्तित्वात नव्हती.

परंतु जनतेच्या कामगारांच्या क्रांतीकारक उठावाने राष्ट्रीय चळवळीच्या भांडवलदार पुढाऱ्यांचा समतोल ढळू लागला होता. चौरीचौराच्या दंग्यामुळे महात्मा गांधीनी जनता अहिसंक लढ्यास आणखी तयार झालेली नसल्याने स्वातंत्र्याचा लढा मागे घेतला.उठावामुळे वस्तुस्थितीत भांडवलदाराला जनतेच्या उठावाचे भय निर्माण होऊन पुढाऱ्यांचा समतोल ढासळला हे स्पष्ट होते.

## औद्योगिक प्रगती

जनतेच्या उठावामुळे कामगार वर्गाच्या संख्येत वाढ झाली व उद्योगधंद्यातही वाढ झालेली होती. १९१८ साली फॅक्टरीची संख्या २४३६ व कामगारांची संख्या ११.२३ लक्ष होती. ती १९२६ साली अनुक्रमे ७२७१ व १५.१८लक्ष याप्रमाणे वाढली. खाणीतील कामगारांची संख्या १९२६ साली २६०११३ होती व विविध उद्योगधंद्यातही वाढ झाली. १९१८ साली जॉईंट स्टॉक कंपन्यात एकंदर ९९.११ कोटी रूपये भांडवलावरून १९२५ साली २७६.९६ कोटी रूपयाने वाढ झाली. रेल्वेच्या धंद्यात १९२० च्या ५६६.३८ लक्ष रुपये भांडवलावरून १९२५ साली ७३३.३७ लक्ष रूपयात वाढ झाली. त्यामुळे कामगार वर्ग हिंदूस्थानात एक प्रमुख वर्ग बनला त्यामुळे भांडवलदार वर्गानी चालविलेल्या कामगार वर्गाच्या पिळवणुकीत वाढ झाली.

## आर्थिक मंदी

पहिल्या माहयुध्दनंतर १० वर्षांनी आर्थिक मंदी निर्माण झाली. त्याआधी २-३ वर्षामध्ये कामगार वर्ग सुसंघटित स्वरुपात अस्तित्वात आला व भांडवलदाराचे कामगारांवर

होणारे हल्ले संप करून परतवून लावले. त्यामुळे कामगार वर्ग हा वर्ग व्यवस्थेत एक क्रांतिकारक स्वरुपात पुढे येत होता. त्यांच्या ताकदीची कल्पना पुढील लढ्यावरून लक्षात येईल हिंदूस्थानात १९२६ साली १२८ संप व कामगार १,३१,६५५ सामील झाले १९२८ साली २०३ संप व ५,०६,८३१ कामगार सामील झाले. वाढत्या संपामुळे युनियनच्या ताकदीत वाढ होऊन मुबई गिरणी कामगार युनियनची (लाल बावटा) सभासद संख्या डिसेंबर मध्ये ५४००० तर मार्च १९२९ मध्ये ६५००० झाली. ट्रेड युनियनमध्ये १९२६, १९२७, १९२८, १९२९ मध्ये वाढ होऊन अनुक्रमे ९५४४, ७५६०२,९५, ३२१, २००३२५ कामगार झाले व १९२९ मध्ये स्वतःला मार्क्सवादी म्हणणारा कम्युनिस्ट पक्षही अस्तित्वात आला होता.

त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाचे साम्राज्यवादी विरोधी चळवळीवर प्रभूत्व निर्माण होण्यासारखी भौतिक परिस्थिती निर्माण झाली होती. दरम्यानच शेतकरी वर्गाचाही उठाव निर्माण झाल्याने तो भांडवलदार चिरडण्याच्या प्रयत्नात होता. महात्मा गांधीजीच्या बारडोल लढा क्रांतिकारक मार्गाने लढला जावू नये म्हणून त्यांचे प्रयत्न चालले होते. या लढ्याची तीव्रता वाढतच गेली.

१९२८ सालच्या सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्यात आला व साम्राज्यशाही विरोधी भावनेने प्रचंड निदर्शने केली. त्याचे पुढारीपण कामगारांनी घेतले. हिंदुस्थानच्या चळवळीच्या पार्श्वभुमिवर १९२८ साली कम्युनिस्ट इंटरनॅशनलने वासहतिक व निमवासहतिक देशातील क्रांतीकारक लढ्यांचे विवेचन करताना कामगार व शेतकरी यांच्या स्वतंत्र संघटना प्रस्थापित करून त्यांना व श्रमिक जनतेला भांडवलदार वर्गाच्या पुढारीपणाखालून काढले पाहिजे. असे हिंदूस्थानच्या क्रांतिकारक चळवळीला लेनिन, स्टॅलिन यांनी मार्गदर्शन केले.

परंतु स्वतःला मार्क्सवाद-लेनिनिवादाचा घोशा घेऊन फिरणाऱ्या हिंदी कम्युनिस्ट पक्षाने पुढाऱ्यांनी लेनिन, स्टॅलिन यांचे आदेश पाळले नाहीत व स्वातंत्र्य लढ्याला या पक्षाने विरोध करूनसाम्राज्यवाद्यांच्या बाजूने ते झुकले व अनेक चुका त्यांनी केल्या.

लहोरच्या १.१.१९३० च्या काँगेस अधिवेशनात पूर्ण स्वातंत्र्य मिळवणे हे काँग्रेसचे ध्येय आहे अशी घोषणा केली व कायदेभंगाचे आदेश दिले. परंतु या लढ्याचे स्वरूप व ध्येय याबाबत जनता आणि काँग्रेसे पुढाऱ्यांत एकरूपता आली नव्हती. २६ जानेवारी १९३० रोजी सर्वत्र उत्साहाने स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. व स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेमध्ये ब्रिटीश राजवटीपुढे इत:पार मान झुकवणे हा मानवजात व परमेश्वर या दोघांच्या विरुध्द गुन्हा आहे. आपण जर स्वइच्छेने मदत करण्याचे बंद केले व कर देण्याचे थांबविले व निवडणुक होत असतानाही हिंसा केली तर या अमानुष राजवटीचा अंत होण्याची खात्री आहे. असे जाहीर करण्यात आले.

या घोषणेमुळे ब्रिटीशांचा शेवट आहे असे समजून उग्र स्वरुपाचा लढा सुरू झाला याचे दडपण ब्रिटीशांवर न आल्याने त्यांनी तडजोडीस मान्यता दिली नाही. त्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांनी लढा सुरू केला या लढ्यात जनतेने भाग घेऊन लढ्याला मोठे स्वरुप प्राप्त झाले. त्यामुळे ब्रिटीश सरकार व काँग्रेस पुढारी भयानक क्रांतिकारक लढ्यास घाबरले व गांधी-.आयर्विन करार करण्यात आल्याने पुन्हा एकदा जनेतच्या उठावास भांडवलीदार काँग्रेस पुढाऱ्यांनी माघार घेतली व गोलमेज परिषदेमधून काँग्रेस पुढाऱ्यांना रिकाम्या हातांनी परत यावे लागले म्हणून पुन्हा लढा उभारावा लागला.

१९३७ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत प्राप्त होऊन जनतेने अनेक प्रांतातील राजसत्ता हाती दिली. परंतु त्याचा उपयोग भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच केला. दरम्यान उजवे व डावे गटात जोरदार संघर्ष झाला. व १९३४ साली मार्क्सवादी पक्ष म्हणून समाजवादी पक्ष जन्माला आला. देश गौरव सुभाषचंद्र बोस यांचे उजव्या पुढाऱ्यांबरोबर संघर्ष झाला. १९३३ नंतर युरोपात हुकुमशहा हिटलर-मुसोलिनी यांची आक्रमक आमदानी सुरू झाली. जपानी फॅसिस्टांनी चीन विरुध्द चढाई केली व त्यामुळे नवे साम्राज्यशाही युध्दाचे ढग जमू लागले. या परिस्थितीचा फायदा घेऊन काँग्रेसने ब्रिटीश साम्राज्यशाहीविरुध्द युध्द पुकारावे अशी डावे गट मागणी करू लागले होते. परंतु काँग्रेसने सनदशीर मार्गानेच राजकारण पुढे चालवले. व १९३९ च्या सप्टेंबर महिन्यात १ तारखेस

दुसऱ्या जागतिक साम्राज्यशाही युध्दाची तुतारी फुंकली गेली व भारतात क्रिप्स योजना १८ ऑगस्ट १९४२ चा चलेजाव ठराव जन्माला आला.

इंग्रजांनी चलेजाव लढ्याला दाद न देता काँग्रेस पुढाऱ्यांना, कार्यकर्त्यांना तुरूंगातच डांबले.त्याला जनतेने जोरदार उत्तर दिल्याने ब्रिटीशांनी रक्तरंजित उत्तर दिले. त्यामुळे गांधीजीनी हा लढा आपला नाही म्हणून पुन्हा एकदा माघार घेतली.चलेजाव लढ्यानंतर हिंदी भांडवलदारांच्या स्थितीमध्ये बदल होऊन ब्रिटीशांशी तडजोडीची भाषा बोलू लागले. परंतु त्यानंतर गांधीजीनी पुढारपणात लक्ष न घालता जनतेच्या उठावाकडे लक्ष दिले नाही.

युध्द तीव्र होऊ वसाहतिक अर्थव्यवस्थेतील विरोध वाढत चालला होता. साम्राज्यशाहीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या द्रारिद्रियात वाढ झाली. उत्पादनात फरक पडल्याने अन्न धान्याची आयात करावी लागली. बंगालच्या उपसागारात अन्न धान्याची कमतरता वाढली व त्यामुळे जनता मृत्युमुखी पडली.

१९२१-२२ साली अन्नधान्याखाली १५.८६ कोटी एकर जमिनीवरून १९४१-४२ साली १५.६५ कोटीवर घसरली. १९२१-२२ मध्ये धान्याचे उत्पादन ५.४३ कोटीवरून १९४१-४२ मध्ये ४.५७ कोटीवर आले. १९३१ साली शेतकऱ्यांवर ९०० कोटीचा बोजा पडला होता. तो १९३७ साली १८०० कोटी झाला. तो पुढे २५०० कोटी झाला. शेतीचे तुकडे व शेतमजुर संख्येत वाढ झाली. १९४४-४५ साली शेकडा ३३६ लोकांना काहीही जमीन नव्हती. शेकडा १७ लोकांना १ एकर जमीन होती व शेकडा २२ लोकांना ३ किंवा त्याहीपेक्षा कमी जमीन होती. शेतमजुरांची संख्या १९३१ साली ३.५ कोटीवरून १९४४-४५ मध्ये ६.५ कोटी झाली. वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढल्या. १९३९ साली सर्व साधारण किंमतींचा आकडा १०० वरून १९४७ जानेमध्ये २९७ व डिसेंबर मेध्ये ३१४ वर गेला व शेतकऱ्याच्या उत्पादनात जवळ जवळ १/२ ने घट होऊन दारिद्रिय पराकोटीला पोहचले. चलनवाढ महागाईला कारण होते. युध्दासाठी इंग्लंडला लागणारा माल हिंदूस्थानकडून खरेदी करून त्याची रक्कम बँक ऑफ इंग्लंडमध्ये हिंदस्थानच्या नावे जमा करण्यात येत होती. १६०० कोटी रुपयांची पौंडी शिल्लक निर्माण झाली होती.

शेतकऱ्यांप्रमाणे कामगार वर्गावर परिणाम झाले. कामगारांचे १९३९ चे मात्र १०० धरल्यास १९४४-४५ साली २५०,१९४५-४६-२५३, १९४६-४७-२६१,१९४७-४८-२९२ याप्रमाणे वाढ झाली. १९३९ चे पूर्वी १९२३ साली मुंबईचा कामगार १.५४ पौंड धान्य रोज घेई सक्तमजुरीचा कैदी १.८७ पौंड आणि साधा कैदी १.६९ पौंड ऐवढे रेशन रोज दिले जाई. यावरून कैद्याइतकेही अन्नही विकत घेण्याची ऐपत कामगाराला नव्हती.

पुढील काळात तीव्रता अधीकच वाढली कामगार संख्येत वाढ झाली. १९४३ साली फॅक्टरीची संख्या १३,२०९ व कामगार २४ लाख ३६ हजार ३१४ याप्रमाणे होती. १९४३ साली खाणकामगार ३ लाख ४९ हजार ३६१ होते. १९४४ मध्ये रेल्वे कामगार ८ लाख ८९ हजार ५६ होते. मळ्यातील कामगार १० लाख ७९ हजार ३४८ होते. त्यात वाढ होऊन १९४६ मध्ये फॅक्टरी कामगार २६ लाख अनियंत्रीत कारखान्यातील कामगार-१० लाख , चहाचे मळे-११.६५ लाख, रेल्वे (सुमारे) १० लाखावर वाढ झाली. १९४७ साली कामगारांचे जीवनमान अहमदाबादमध्ये ३२२, सोलापूर-३६०, कानपूर-४०० असे सरकारी आकड्यानुसार होते. परंतु प्रत्यक्षात यापेक्षा कितीतरी जास्त होती. कामगार शेतकऱ्यांच्या वाढत्या दारिद्रयाबरोबर भांडवलदारांचे नफे मात्र वाढत होते.

भांडवलदार नफा (१९२८:१००)

| सन | सर्व धंदे | कापड गिरण्या |
|---|---|---|
| १९३९ | ७२.४ | १५४.६ |
| १९४० | ९९.९ | २२०.१ |
| १९४१ | १३५.४ | ४८९.१ |
| १९४२ | १६९.४ | ७६०.७ |
| १९४६ | १५९.४ | ६८०.५ |

वरील आकड्यावारीवरून भांडवलदारांच्या नफ्यात कितीतरी पटीने वाढ झालली दिसते. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीच्या वाढीला लागणारे भांडवल अपुरे पडू लागले व पुढे बॉम्बे प्लॅन तयार झाला.

## आर्थिक लढा

१९४६-४७ मधील परिस्थितीमुळे कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग, लष्कर, पोलीस इ. सर्व व्यवसायातील लोकांनी आपापल्या मागण्यांसाठी देशभारात संप केले. त्यामध्ये सरकारी नोकरांचाही समावेश होता. मुंबई, बिहार येथील मोर्चे संप आधिकच चिघळले. त्यामुळे हिंदी भांडवलादार व साम्राज्यशाही यानी ब्रिटीशांना हातमिळवणी केली. म्हणून तो अँग्लो अमेरिकन साम्राज्यशाहीच्या गटात सामील झाला. युध्दात ब्रिटीश कमकुवत झाले. हिंदूस्थानवर सत्ता टिकवणे अवघड बनले व त्यातून माउंटबॅटन योजना अंमलात येऊन हिंदूस्थानला स्वातंत्र्य मिळाले. परंतु हिंदूस्थानात ब्रिटीश राष्ट्रकुलात राहण्याच्या निर्णयाने त्याचे स्वरूप स्वातंत्र्यात आले नाही. आर्थिकदुष्ट्या साम्राज्यशाही भांडवलादाराच्या हातात हिंदूस्थान राहिला.

## लेनिन-स्टॅलिनचे इशारे

१९२० साली लेनिनेने बेगडी स्वातंत्र्य बहाल करून जनतेची फसवणूक करण्याचा प्रयत्न साम्राज्यशाही करते व त्याला वसाहतीतील राष्ट्रीय भांडवलादार मदत करतात. ही. गोष्ट नमूद केली होती. १९२० च्या इंटरनॅशनलच्या भरलेल्या तिसऱ्या कॉंगेस राष्ट्रीय आणि वसाहत देशांचा प्रश्न या संबंधीच्या सिध्दांताचा जो प्रास्ताविक मसुदा लेनिनने सादर केलेला होता. त्यात तो म्हणतो. साम्राज्यवादी सत्तांनी राजकीय दृष्ट्या स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या मिषाने आपल्यावर औद्योगिक, अर्थिक, लष्करीदृष्ट्या सर्वस्वी अवलंबून असलेली राज्ये निर्माण करून जनतेची जी फसवणूक चालवलेली आहे. ती जनतेसमोर चव्हाट्यावर मांडून तिचे खरे स्वरूप स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. १९२४ साली स्टॅलिनने सांगितले की क्रांतीला साम्राज्यशाहीपेक्षाही जास्त घाबरणारे, स्वतःच्या राष्ट्राच्या हितापेक्षा स्वतःच्या थैल्यांची काळजी जास्त वाहणारा,भांडवलदारांचा हा विभाग सर्वात श्रीमंत आणि सर्वात वजनदार असणारा हा विभाग, स्वतःच्या देशांतील कामगार शेतकऱ्यांच्या विरुध्द साम्राज्यशाहीशी गट्टी करून क्रांतीच्या कट्टर शत्रूच्या गोटात पूर्णपणे सामील होत आहे.

## माउंटबॅटन योजना

स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानचे पाकिस्तान व हिंदुस्थान हे दोन तुकडे करण्यात आले. या योजनेनुसार करण्यात आले. दोन्ही देशात माउंटबॅटन पती-पत्नीच्या उपस्थितीत स्वातंत्र्याचे सोहळे साजरे करण्यात आले. त्यामुळे हिंदूस्थान व पाकिस्तानाच्या अर्थिक स्थितीवर परिणाम झाला. कापड गिरण्या व तागाचे कारखाने हिंदूस्थानात होते. तर पाकिस्तानात ताग अधिक मिळवणारी जमीन होती. त्यामुळे दोन्ही देश एकामेकांवर अवलंबून होते. त्यामुळे व्यापाराचा फायदा इंग्लंड अमेरिकेला घेणे शक्य झाले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्याचा पुकारा करण्यात आला. परंतु हिंदूस्थानातील ८०० ते ९०० कोटी रूपयाचे परकीय भांडवल कायम राहिले. कोळसा, चहा, ज्यूट हे महत्वाच्या उद्योगधंद्यावर ब्रिटीशांची मक्तेदारी कायम राहिली. १९४८ मध्ये ५ कोटी १० लाख रूपयाचे नवे परकीय भांडवल हिंदूस्थानात गुंतवले गेले. तर १९४९ मध्ये त्यात वाढ होऊन १६ कोटी ९० लाख झाले. सत्तांतरानंतर हिंदूस्थानात नवेनवे अॅंग्लोइंडियन व अमेरिकन इंडियन संयुक्त कारखाने व कंपन्या स्थापन झाल्या. या कंपन्यातून परदेशी भांडवल एकंदर भांडवलाच्या ४९% पेक्षा जास्त असू नये असा कायदा लोकांच्या डोळयात धूळ फेकण्यासाठी करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात ४९% पेक्षा अधिक भांडवल घालण्याची परवानगी दिली असून त्या भांडवलाच्या संरक्षणाची हमीही घेतली आहे.

याचा फायदा मूलभूत धंद्याना न होता विमानतळे, लष्करी तळ, वाहतुकीची साधने, दारूगोळयांचे कारखाने यासाठी होता. तसे प्रयत्नही अॅंग्लो अमेरिकन साम्राज्यवादी मोठ्या प्रमाणावर करत होते. मूलभूत विकासाकडे मुद्दामपणे डोळे झाक करण्यात येत होती. त्यामुळे कच्चा माल पुरवणारा देश हे हिंदूस्थानचे स्थान आजही कायम आहे.

## भांडवलदारांची हिंदी घटना

दाभाडी प्रबंधात शेतकरी कामगार पक्षाने भारतीय घटना भांडवलदारांसाठी तयार करण्यात आली असे म्हटले, सत्तांतरानंतर बनविलेल्या घटनेत आजच्या स्वातंत्र्य विरोधी राजवटीचे उत्तम प्रतिबिंब पहावयास मिळते- खाजगी मालकीच्या हक्कास घटनेत मान्यता दिली. त्यामुळे परकीय भांडवलास, सरंजामशाही यांना बाधा येणार नव्हती,सामाजिक

हितासाठी सक्तीने नागरिकांना कामास लावण्याची, आणीबाणीत दडपशाहीचे कायदे करण्याची सवलत यासारखे हिटलरी अधिकार यांना फॅसिस्ट घटनेत स्थान दिले आहे.साम्राज्यवादी नोकरशाही कायम ठेवून १९४२ चा क्रांती लढा क्रूरपणे दडपून टाकणाऱ्यांना बढती मिळाल्या. आझाद हिंद फौजेस सैन्यात स्थान दिले नाही. संस्थानिकांना तनखे देण्यात आले.

त्यामुळे हिंदूस्थानात ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी आपली आर्थिक, राजकीय व लष्करी राजवट नव्या स्वरूपात कायम ठेवली. अँग्लो–अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे हस्तक बनलेले पटेल–नेहरू सरकार परराष्ट्रीय राजकारणतही त्या साम्राज्यवाद्यांच्या ओंजळीने पाणी पीत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्याही गटात सामील न होता स्वतंत्र राहण्याची भूमिका व तिसऱ्या गटाची घोषणा ही जनतेच्या डोळयात धूळ फेकण्यासाठी आहे.

त्यामुळे रक्ताचा सडा सांडूनही रक्तविहीन क्रांटी केल्याचे नेहरू–पटेल यांनी खोटा प्रचार केला.

## नेहरूंचा साम्राज्यवाद्यांना पाठिंबा

पंडित नेहरू साम्राज्यवाद्यांचे हस्तक बनले होते असा आरोप वक्त्याने दभाडीत केला २१ ऑगस्ट १९४९ रोजी उत्तर अमेरिकेतील अलायन्स पत्राला दिलेल्या नेहरूंच्या मुलाखतीत भांडवलदारांना पुढील आश्वासन दिले, हिंदुस्थानातील उद्योग धंद्यात गुंतवलेल्या परदेशी भांडवलावरील नफ्याची शाश्वती व भांडवलाला सरंक्षण हिंदुस्थानात मिळालेल्या नफ्याचे डॉलर्समध्ये रुपांतर करण्याची मोकळीक, जर धंद्याचे राष्ट्रीयकरण केले तर त्यात गुंतविलेल्या परकीय भांडवलाचे नुकसान भरपाईसकट डॉलर्सच्या चलनात परत करणे, पुढची निदान १० वर्षेपर्यंत उद्योग धंद्याचे राष्ट्रीयकरण न करणे त्यामुळे नेहरु साम्राज्यवाद्यांचे हस्तक बनून वसाहत देशातील स्वातंत्र्य लढे चिरडून टाकण्यासाटी साम्राज्यवादी गट ज्या कारवाया करत आहे. त्यावर नेहरू बुरखा घालत आहेत. मलायन जनतेविरुध्द लढण्यासाठी गुरखा फलटणीची भरती करत आहे. ब्रम्ही जनतेला चिरडून टाकणाऱ्या सरकारला मदत करीत आहे. व्हिएतनाममध्ये प्रस्थापित हो–चि–मिन्ह सरकारला मान्यता द्यायचे नाकारीत आहे. नेहरू– लियाकत करार, कराची भेट, या सर्व घटना म्हणजे

नेहरूंचे भांडवली सरकार साम्राज्यवाद्यांचे खरे हस्तक बनले असून त्या नात्याने हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे शत्रू बनले आहे.

चीनमध्ये लोकशाही क्रांती झालेली होती. तसेच ब्रम्हदेश, व्हिएतनाम, इंडोनेशिया, मलाया, फिलीपाईन्स येथील लढे साम्राज्यवादी नेत्यांचे विरोधी जात होते व हिंदूस्थान हा साम्राज्यशाहीचा शेवट होता. त्यामुळे क्रांतिकारक जनतेच्या लढ्यात स्वातंत्र्याच्या लढाईत सामील झालेल्या जनतेशी भांडवलदार पुढाऱ्यांनी साम्राज्यशाहीशी तडजोड करून प्रतिक्रांतिकारक बनले. म्हणून दाभाडी प्रबंधात शे.का.प.ने स्वातंत्र्याचे वर्णन हिंदूस्थानात स्वतंत्र झाल्याचा कितीही गवगवा करण्यात येत असला तरी हिंदूस्थानात व ब्रिटन यांच्या आर्थिक, संबंधात मूलभूत फरक झालेला नाही. हिंदूस्थानची अर्थव्यवस्था वसाहातिक स्वरूपाचीच आहे. गेल्या पंचवीस वर्षात हिंदी स्वातंत्र्य लढ्यातून कम्युनिझमच्या रोपट्याचा योग्य विकास आजिबात झाला नाही. या दुर्देवी परंतु महत्वाच्या घटनेमुळेच हिंदी राष्ट्रीय भांडवलदार आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याचा अशा रितीने विश्वासघात करू शकले.

## वाढती आर्थिक दु:स्थिती

दाभाडी प्रबंधात स्वातंत्र्यानंतर साम्राज्यवाद्यांचे हस्तक बनलेल्या नेहरूंनी जनतेची विकट परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे शेतकरी, कामगार, शेतमजुर, गरीब-मध्यम शेतकरी व शहरी श्रमिक जनता या सर्वांची आर्थिक परिस्थिती आधिकच तीव्र झाल्याने या भागात देशाच्या आर्थिक पडझडीचा वेध घेतला. १९४९ मध्ये १८० कोटी रुपयांचे धान्य आयात करावे लागले. सर्वसाधारण राहणीमानाचा इंडेक्स क्रमांक जून १९४७ मध्ये २९४.२, जून १९४८ मध्ये ३८२.२२, १९४९ सप्टेंबर-३७९.८, १९४९ ऑक्टोबरमध्ये आधिकच होऊन ३९३.३ इतका झाला. अन्नधान्याचा इंडेक्स नंबर १९४७-१९४८-१९४९ मध्ये अनुक्रमे २८७,३७७,३८१ इतका होता. १९४९ सप्टेंबरमध्ये ४०३.१, १९४९ ऑक्टोबर एकाच महिन्यात ४०६.८ पर्यंत चढला, डाळीच्या किमंती १९४७, १९४८ अनुक्रमे ३०६,४०८ इतका झाला व १९५० मध्ये तो ४६९.६ वर चढला होता. त्यावेळी प्रमुख उद्योगात घट होत होती. कापूस ज्यूट, साखर या प्रमुख उद्योगधंद्याच्या उत्पादनात १९४९ मध्ये अनुक्रमे १०,१४,४,६.९ इतकी टक्के कपात झाली तर १९३९-४० पासून १९४७ ते ४८

पर्यंत दर माणसी उत्पादन धान्य ३८८ पौंडावरून ३५० पौंडवर आले. आणि कापड १६ वारांवरून ११ वारांवर आले. गिरण्या बंद पडत आहेत. बेकारीचा आकडा फुगत चालला होता. लेबर एम्प्लॉयमेंटमध्ये नावे नोंदवलेल्या लोकांची संख्या १९४७ मध्ये ५.७ लक्ष असून १९४८ मध्ये ८.७१ लाख इतकी वरती गेली. ५ मे १९५० च्या सरकारी अहवालानुसार मुंबई राज्यात १० कापड गिरण्या पूर्णपणे बंद असून १३ गिरण्यांच्या काही पाळया बंद आहेत. त्यामुळे २७,१३६ कामगार बेकार झाले आहेत. तर १८ गिरण्या बंद करण्याच्या नोटीसा दिल्याने ३१,२१९ कामगार बेकार होणार आहेत. बेकारांचे आकडे वाढत असताना भांडवलदारांचे नफे वाढत होते. बॉम्बे डाईंग, कांदेजिया, सेंचुरी, गोकाक, स्वदेशी, कोहिनूर टाटा या कापड गिरण्यांचा एकूण नफा १९४७ साली १८३.७५ लाखावरून तो १९४८ मध्ये ५११.३३ लाख वाढला होता. शेतमजुरांची संख्या १९३१ मध्ये ३ कोटी ५० लाख होती ती १९४४ मध्ये ६ कोटी ८० लाखपर्यंत वाढली. शेतमजुरांच्या पगाराचा पाया ठरला नाही, राहणीचे मान भयंकर वाढलेले असूनही त्याचे दर दिवसाचे उत्पन्न ८ ते १२ आणे इतकेच असते असे सरकारी चौकशी कमिटीने २३ एप्रिल १९५० रोजी प्रसिध्द अहवालात नमूद केले होते.

यामुळे लहानश्या जमीनीच्या तुकड्यावर शेतकऱ्यांचे कुंटुंब जोपासणे अवघड जात होते. वस्तुंच्या किमती वाढत होत्या परंतु सरकार धान्याच्या किमंती उत्पादन किमतीपेक्षा कमी ठरवून देत होते. शहरी मध्यम वर्गाची स्थिती दिवसेंदिवस बिकट बनत चालली होती. व्यापारी, फेरीवाल्यांची अवस्था कठीण झाली होती. सरकारी नोकरदारांचे संसार उघड्यावर येण्याची भिती निर्माण झाली. जीवनावश्यक वस्तुच्या गरजा भागवता भागवता नाकी नऊ आले होते. अशी परिस्थिती असतानाही भांडवलशाही टिकवण्यासाठी नेहरू सरकारचे प्रयत्न चालू होते. देशात कामगार, शेतकरी संघटना यांच्या दडपशाहीचे धोरण अवलंबुण गोळीबार व तुरंग, लाठीमाराला जनतेला सामोरे जावे लागत आहे. लोकशाहीच्या तत्वाला बहुमताला सरकार पायाखाली तुडवून कामगारांचे संपाचे हक्क जनतेचा हक्क ,न्यादानामचा हक्क , सर्वोदयाच्या नावाखाली सरकार दडपून टाकत होते. मुलबूत हक्कावर गदा आणली होती.

त्यामुळे स्वातंत्र्याचा क्रांतिकारक लढा देशातील साम्राज्यवाद्यांच्या पिळवणूकीविरुध्द क्रांतिकारक लढ्यासाठी पुन्हा तयारीला लागली होती.

## हुकूमशाही सरकारविरुध्द जनतेची लोकशाही लढाई

प्रत्यक्ष लोकशाहीचे धोरण नेहरू सरकारने अवलंबलेले असले तरी विरोधी जनतेची लोकशाही आघाडी उलथून टाकण्याचा प्रयत्न चालला होता. म्हणून लोकशाही स्वातंत्र्यांसाठी व जागतिक शांततेसाठी नेहरू सरकार विरुध्द देशात परिस्थिती अस्तित्वात येत होती.परंतु अशा प्रकारची चळवळ निर्माण होऊ शकली नाही. त्याला दाभाडी प्रबंधात शे.का.प.ने कारण स्पष्ट करताना म्हटले की. देशात क्रांतीकारक परिस्थिती झपाट्याने निर्माण होत असली तरी त्या परिस्थितीचा फायदा घेणार क्रांतीकारक पक्ष या देशात नाही. जनतेचा हा भडकलेला असंतोष संघटित करून हिंदी जनतेच्या साम्राज्यशाही विरोधी राष्ट्रीय स्वातंत्र्यांचा लोकशाही मोर्चा उभा करण्याचे ऐतहासिक कार्य हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे आहे. पण त्या पक्षाने मध्यमवर्गीय पुढारीपण हेच कलकत्त्याच्या अधिवेशनानंतर ट्राटस्कीवादी साहसबाजीला (Adventurism) बळी पडले असून या ऐतिहासिक कार्यात पाठमोरे झाले आहे. मार्क्सवादी म्हणविणाऱ्या पार्टी पुढाऱ्यांनी हे असे क्रांतीस अपाय कारक धोरण स्विकारल्यामुळे मार्क्सवादी विरोधी पवित्रा घेऊन सुधारणावाद अवलंबणाऱ्या समाजवादी पक्षाच्या पुढाऱ्यांना जनता चळवळीच्या धाडीत फाटाफूट करून तिला खच्ची करण्याची नामी संधी मिळाली आहे.

वरील माहितीवरून असे लक्षात येत की राष्ट्रीय परिस्थितीची मांडणी करताना दाभाडी प्रबंधात शे.का.प ने असा उल्लेख केला की हिदूस्थानच्या भांडवलधार्जिण्या पुढाऱ्यांनी इंग्रजांशी तत्वाला बाधा आणत तडजोडी केल्या व शेतकरी- कामगारांच्या उठावावर निर्बंध आणले. त्यांची उत्पादन वाढट असताना श्रमजीवी जनतेची परिस्थिती हलाखीची बनत चालली होती. हे वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते. देश स्वतंत्र झाला तरी तेथे अर्थव्यवस्था वसाहतिक स्वरूपाची राहिली हे लेनिन व स्टॅलिन यांनी स्पष्ट केले होते. परतु त्यांच्या म्हणण्याकडे हिंदी कम्युनिस्टांनी दुर्लक्षच केले त्यामुळे त्यांचा प्रभाव वाढू शकला नाही. त्यामुळे मिळालेले स्वातंत्र्य हे कुचकामी होते. घटनेत जनतेवर निर्वध लादताना परकियांना सरंक्षण देण्याचा प्रयत्न केला. म्हणून प्रबंधकर्त्यांना घटना ही

सरंजामशाही, भांडवलदारास अनुकूल व जनतेची पिळवणी करणारी होती व पुन्हा ब्रिटीशांच्या गोटात सामिल झालेले धोरण साम्राज्यावाद्यांकडे झुकलेले दिसले.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ब्रिटीश देश सोडून गेल्यानंतर देशातील अर्थव्यवस्था पार ढासळली. मालाच्या किमतींत भरमसाठ वाढ झाली त्यामुळे कामगार, शेतकरी, शेतमजूर, मध्यमवर्ग, शहरी श्रमिक वर्गावर जीवन जगण्यचे प्रयत्न करावे लागले. परंतु या वर्गाच्या उत्पादनात वाढ झाली नाही. उलट त्यांना दडपशाहीला सामोरे जावे लागले. असे दाभाडी प्रबंधात शे.का.प. दडपशाही करणाऱ्या सरकारचा साम्राज्यावादी भांडवलदार असा उल्लेख केला. सरकारच्या दडपशाहीमुळे लोकशाही स्वातंत्र्याच्या चळवळीस परिस्थिती निर्माण झालेली होती. असे असूनही देशातील हिंदी कम्युनिस्ट मानणाऱ्या पुढाऱ्यांना त्याचा फायदा उचलता आला नाही. व देशात क्रांतीकारक पक्ष बनण्यास परिस्थिती निर्माण झालेली असतानाही त्या स्वरूपाचा पक्ष एकही पक्ष निर्माण होऊ शकला नाही. कम्युनिस्ट पक्ष व साम्यवादी पक्षाला अपयशालाच सामोरे जावे लागले हे दाभाडी प्रबंधात शेतकरी कामगार पक्षाने राष्ट्रीय परिस्थितीच्या घटकार स्पष्ट केले होते.

## २.३ हिंदी कम्युनिस्ट पक्ष पुढारीपणाच्या घोडचुका

***हिंदी कम्युनिस्ट पक्ष***

कामगार वर्गातून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात हिंदी कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात आला होता. त्यांना आंतरराष्ट्रीय कम्युनिस्टांचे मार्गदर्शन लाभले होते. राष्ट्रीय चळवळीत वर्ग संघर्ष लढ्याचे नेतृत्व करून क्रांतीकारक चळवळीचे उद्दिष्ट मार्गदर्शनात होते. स्वातंत्र्य लढ्यात जनतेच्या असंतोषाचे साम्राज्याशाहीत १९३० साली विरुध्द दिशा निर्माण झालेली होती. परंतु कम्युनिस्ट पक्षाने याला पाठींबा न देता विरोध दर्शविला होता. दाभाडी प्रबंधात कम्युनिस्टांनी केलेल्या चुकांचा सविस्तर आढावा घेतला होता.

कम्युनिस्ट इंटरनॅशनलने केलेल्या ठरावात इशारा दिला होता की वसा(तिक देशातील साम्राज्याशाही विरोधी चळवळीचे स्वरूप राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या लढ्याचे असते आणि या राष्ट्रीय घटकाचा प्रभाव त्याच्या व्यावहारिक परिस्थितीच्या अनुरोधाने अत्यंत काळजीपूर्वक तपासणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. परंतु ही गोष्ट हिंदी कम्युनिस्टपक्षाच्या मध्यमवर्गीय

पुढारीपणाला कधीच उमगली नाही. भांडवली राष्ट्रीय सुधारणावादाचे मध्यम वर्गावर, शेतकरी जनतेवर आणि कामगार वर्गाच्या काही भागावर चळवळीच्या पहिल्या अवस्थेत तरी निदान जे वजन असते त्यामुळे त्याला सरंजामदार साम्राज्यशाही गटापेक्षा निराळेच महत्त्व प्राप्त होते. या गोष्टीचे जर कमी महत्त्वमापन झाले तर त्यामुळे पंथ प्रवृत्तीचे धोरण आखले जाऊन कम्युनिस्ट पक्ष बहुजन समाजापासून अलग पडतो

चळवळीत शेतकरी कामगार वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. या चळवळीत खंडबंदी, करबंदी लढ्याचे प्रकार हाताळले गेले. व हजारो लोकांना तुरूगांत डांबले गेले. १९३२ मे महिन्यात ८०,००० लोकांना तुरूंगात डांबले त्यात वाढ होऊन ही संख्या १२०००० इतकी वाढली या चळवळीचा विस्तार व खोली प्रचंड मोठ्या प्रमाणात झालेली असताना व जनतेच्या प्रत्येक थरातील लोक यात सामील झालेले असताना या लढ्याचे नेतृत्त्व करणे, त्यात सामील होणे व चळवळीला वरच्या पायरीवर नेणे या गोष्टी न करता कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यमवर्गीय पुढारीपणामुळे या राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या लढ्याचे पुढारीपण राष्ट्रीय सुधारणावादी आहे. असा प्रचार करून त्या नावाखाली या लढ्याला विरोध केला.

शेतकरी कामगार पक्षाने त्याचे परिणाम काय झाले हे दाभाडी प्रबंधात स्पष्ट केले आहे.

१) राष्ट्रीय चळवळीवरील भांडवलदारी पुढारीपणाचे प्रभुत्त्व अबाधित राहिले आणि त्यांनी जनतेच्या साम्राज्यशाही विरोधी उठावाचा उपयोग साम्राज्यशाहीवर दडपण आणून काही सवलती मिळवण्याकडे करून घेतला.

२) या लढ्यात सामील झालेल्या जनतेला वर्गीय दृष्टीकोन येऊ शकला नाही आणि त्यामुळे तिच्या राजकीय जाणीवेत योग्य वाढ झाली नाही. व तिला सुसंगत क्रांतीकारण दृष्टी येवू शकली नाही.

३) जनतेवरील भांडवली राष्ट्रीयत्वाची पकड कायम राहिली.

४) सर्वसाधारण जनतेत कम्युनिझमचे बीज पेरले गेले नाही.

## कम्युनिस्ट पक्षाने इंटरनॅशनलचे मार्गदर्शन डावलले

१९३५ सालातील इंटरनॅशनलच्या सातव्या कॉंग्रेस जो वसाहती संबंधीचा अहवाल सादर केला त्यामध्ये वँग भिंग म्हणतात ' आपला पंथ प्रवृत्तीच्या धोरणाने साम्राज्यशाही विरोधी जनतेच्या उठावापासून अलग राहिल्याने कम्युनिस्ट गटाने वास्तविकरित्या जनतेवरील गांधीवादाची आणि राष्ट्रीय सुधारणावादाची पकड कायम ठेवण्यास मदत केली आहे. अशी त्यांनी हिंदी कम्युनिस्टावर टीका केली. जर्मनीत फॅसिस्ट राजवट प्रस्थापित झाल्यानंतर जागतिक आढावा घेऊन कम्युनिस्ट इंटरनॅशनलने ७ व्या कांग्रेसमध्ये हिंदी कम्युनिस्टांना मार्गदर्शन केले . फॅसिझम आणी कामगार वर्गाची एकजूट या अहवालात कॉ. डिमेट्रॉव्ह म्हणतात, हिंदूस्थानातील कम्युनिस्ट पक्षाने राष्ट्रीय सुधारणावादी पुढारीपणाखाली होत असलेल्या चळवळीसकट सर्व साम्राज्यशाही विरोधी जनतेच्या चळवळींना पाठिंबा द्यावा, त्यात भाग घ्यावा व त्याचा विस्तार वाढवावा. आपले राजकीय व संघटनात्मक स्वातंत्र्य कायम ठेवून हिंदी राष्ट्रीय कॉंग्रसमध्ये भाग घेणाऱ्या सर्व संघटनात प्रत्यक्ष कार्य करावे आणी त्यांच्यात राष्ट्रीय क्रांतीकारक गट प्रस्थापित होण्याच्या क्रियेस मदत करावी या सर्वांचा हेतू हिंदी जनतेचा ब्रिटीश साम्राज्यवादा विरुध्द चाललेला स्वातंत्र्यलढा तीव्र करणे हाच आहे.

७ व्या कॉंग्रेसनुसार जर्मनी, इटली जपानमधील असलेल्या फॅसिस्टवादाचे कारण स्पष्ट करून या काळातील संकटाला तोंड देऊन आंतरराष्ट्रीय एकजूटीचा कार्यक्रम त्यांनी आखला होता. तो महत्त्वपूर्ण टप्पा होता. हे कार्य इंटरनॅशनल कम्युनिस्टांनी पार पाडलेले होते.

## क्रांतिकारक परिस्थिती

१९३७ आधीच्या काळात साम्राज्यविरोधी लढ्याची परिस्थिती निर्माण झालेली होती. कारण दुसरे युध्द निर्माण होऊ घातले होते. महायुध्द सुरू झाले तेव्हा फॅक्टरीची एकूण संख्या १०,४६६ असून त्यात १७५११३७ ऐवढे कामगार काम करीत होते. व खाण कामगार ३५,३००० रेल्वे कामगार ६९९१५३. मळयातील कामगार १०४५७५४ होते. व या काळात

जॉइन्ट स्टॉक कपन्यात गुंतवलेले भांडवल २५१ कोटी रुपये होते. या काळात कामगारांची संख्या व संघटना यात पुष्कळच वाढ झालेली होती.

हिंदुस्थानमध्ये युध्द चालू असताना कॉंग्रेस मंत्रीमंडळे सत्तेवर होती. युध्दाच्या आधीच कॉंग्रेसने साम्राज्यशाही युध्दाला विरोध केला होता. परंतु दाभाडी प्रबंधात शे.का.प म्हणतो कॉंग्रेसने साम्राज्यवाद्यांशी तडजोडी केल्यानंतर जनतेच्या उठावाला विरोध केला. म्हणून त्यांनी मंत्रीमंडळाचे राजीनामे सादर केले व नंतर वैयक्तिक सत्याग्रह पुकारला, त्याचा क्रिप्सला फायदा न झाल्याने कॉंग्रेसने छोडो भारत आंदोलन छेडले होते.

## कम्युनिस्टांचे धरसोडीचे धोरण

प्रबंधकर्त्यांच्या म्हणण्यानुसार १९३७ ते १९४१ या काळात कम्युनिस्टांचे धोरण संधीसाधूपणाचे होते. भौतिक परिस्थिती निर्माण झाली असतानाही त्यांनी क्रांतीकारक पाऊल टाकले नाही. सोलापूरातील कम्युनिस्टांच्या पुढारीपणाखाली असलेला हा कामगार वर्ग हा जाणून बुजून कॉंग्रेस बाहेर ठेवण्यात आला. कॉंग्रेसशी संयुक्त मोर्चा उभारण्याचे कार्य तांत्रिक स्वरूपात अमलात आले. १९३९ साली युध्द चालू झाल्यानंतर रायगड कॉंग्रेसच्या निवडणूकी झाल्यानंतर जनतेत युध्द विरोधी भावना अत्यंत तीव्र होती. महागाई भत्त्यासाठी दोन महिन्यांचा संप केला याचा फायदा कॉंग्रेसने घेतला नाही हे कॉंग्रेस विरोधी जागृती निर्माण करून कम्युनिस्टांना जनतेच्या चळवळीच्या पाठीमागे नेणे शक्य होते. परंतु त्यांनी कॉंग्रेसमधील भांडवली पुढारीपणाशी हातमिळवणी करून महाराष्ट्रात कॉंग्रेसच्या निवडणूका बिनविरोध करण्याचा करार केला.

## लोकयुध्दाची घातकी घोषणा

दुसऱ्या महायुध्दात जर्मनीने रशियावर चढाई केल्याने युध्दाचे स्वरूप बदलले. या बदललेल्या स्वरुपाची दखल हिंदी कम्युनिस्टांनी घेतली नाही. वेळ गेल्यानंतर याची दखल घेऊन लोकयुध्दाचे धोरण स्वीकारले. तो पर्यंत साम्राज्यवाद्यांचे , सरंजामदारांचे स्थान बळकट झाले होते. लोकयुध्दाची ही त्यांची भुमिका ही सोव्हिएट युनियच्या ताकदीविषयी घेतलेली होती व हिंदुस्थानातील साम्राज्यवाद्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील चुकीची भुमिका ही दोन्ही कारणे बदललेल्या धोरणाची होती. त्यामुळेच राष्ट्रीय चळवळीच्या व वर्गीय लढ्याच्या

वैशिष्ट्याचा हिंदी कम्युनिस्ट पक्षाला पूर्णपणे विसर पडला होता. आणि हिंदी क्रांतीकारकांच्या विरोधी भुमिका ब्रिटीशांच्या तडजोडीतून घेतली देशातील कामगार, शेतकरी, शेतमजूर,मध्यमवर्ग, नोकरदार शहरी श्रमिक इ.चे सर्व संप हा राजकीय पराभव असे त्यांनी ठरविले व त्यांच्या भावनांविषयी. मागण्याविषयी कोणतीही चळवळ उभी केली नाही.

हिंदुस्थानविरोधी कारवायांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिला. त्याचाच अर्थ देशाची सुत्रे कॉंग्रेसच्या हातात देण्यास कम्युनिस्ट पक्ष कारणीभूत ठरतो.

## कम्युनिस्ट पुढारीपणाने कॉंग्रेस श्रेष्ठींना देशाचे पुढारीपण बहाल केले

दाभाडी प्रबंधात शेतकरी कामगार पक्षाने अतिशय परखड प्रतिक्रिया हिंदी कम्युनिस्टांनी स्वातंत्र्य चळवळीतील चुकावर केली. देशाचे नेतृत्व कशा स्वरूपात कॉंग्रेसकडे गेले याचा शे.का.प.ने सविस्तर आढावा प्रबंधकर्त्याने दिला आहे.

१९४१ च्या अखेरीस कम्युनिस्टांनी वरील भुमिका घेतल्याने कॉंग्रेसमधील भांडवलदारी राष्ट्रवादी पुढारीपणाचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे भांडवलदारीला , साम्राज्यशाहीला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यात कॉंग्रस आपले डावपेच आखता आले. १९४१-४२ सालातील परिस्थिती ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या अतिशय विरोधी होती तसेच जपानचा हल्ला हिंदूस्थानवर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. पण हिंदी कम्युनिस्ट आपल्या धोरणापासून अलग झाल्याने भांडवलशाही पुढारीपणाने लढ्याचे सर्व तंत्र आपल्या सोयीप्रमाणे आपल्या मवाळ पध्दतीने लढविले गेले व भारत छोडो , करेंगे या मरेंगे यासारख्या घोषणा जनतेच्या माथ्यावर लादल्या गेल्या. त्यातून नवेनवे मार्ग शोधून निघाले. या नव्या मार्गावरही हिंदी कम्युनिस्टांनी परखड टीका केली. सातारच्या प्रतिसरकारला चोर-दरोडेखोर ठरवले, आझाद हिंद सैन्याची उभारणी करणाऱ्या नेताजींवर चीड आणणारे आरोप केले.या टीका आत्मटीकेच्या स्वरूपात असल्यातरी त्याचे भयंकर परिणाम झाले. राष्ट्रीय स्थरावर त्याचे परिणाम कम्युनिस्ट जनता व कामगारापासून अलग झाल्याने तो वर्ग भांडवलदार व समाजवाद्यांच्या आहारी जाऊ शकला व कामगारात त्यांना स्थान प्राप्त झाले. त्यामुळे हा वर्ग कम्युनिस्ट विचारसरणीपासून दूर गेला. आंतरराष्ट्रीय स्थरावर क्रांतीकारक जनतेचे अग्रदल हे सोव्हिएट युनियनचे स्थान हिंदी जनतेच्या डोळयाआड आले व हिंदी

कम्युनिस्टांनी घेतलेल्या चळवळीविरूध्द भुमिका रशियाच्या मार्गदर्शनाखाली घेतली असा अप्रचार भांडवलदार साम्राज्यवाद्यांना करता आला. त्यामुळे रशियाबद्दल जनतेत चीड निर्माण झाली. तसेच जनतेची फसवणूक करणारी तिसऱ्या गटाची योजना कॉंग्रेस पक्षाने केली.कम्युनिस्ट पक्षाच्या पुढारीपणाने कलकत्यानंतर नवीन आखलेले व्यूहरचना व डावपेच मुलतः चुकीचे असल्याने हा पक्ष आपली ऐतहासिक जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ ठरला. या पक्षपुढारीपणाने आणखी महत्वाची चूक म्हणजे हिंदी क्रांतीच्या डावपेचाची चर्चा करणाऱ्या प्रबंधात आंध्र पक्षाच्या पुढारीपणावर टीका करताना म्हटले की आपण क्रातींच्या ज्या अवस्थेत आहोत त्या अवस्थेत रशियन क्रांतीच्या दोन्ही (फेबु. ऑक्टो) अवस्थांची लक्षणे अंशतः आहेत. याचा अर्थ असा की हिंदी परिस्थितीतील भांडवली लोकशाही क्रांतीची आणि कामगार क्रांतीची सरमिसळ झाली आहे. यातून निष्कर्ष निघतो की यापुढचा हिंदूस्थानचा लढाही वसहतिक जनतेच्या लोकशाही स्वरूपाच्या राजसत्तेच्या प्रस्थापनेसाठी होणार नसून जवळ-जवळ कामगारांच्या हुकुमशाहीच्या प्रस्थापनेसाठी होणार आहे

दाभाडी प्रबंधात क्रांतींच्या अवस्था चुकीच्या दृष्टीने केली असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे घोषणा व डावपेचही चुकीचेच असणार हे साहजिक होय.हिंदी कम्युनिस्टांनी केलेल्या चुका शे.का.प.ने प्रबंधात स्पष्ट केल्या.

१) हिंदी क्रांती कम्युनिस्ट इन्टरनॅशनलने वर्णन केलेल्या क्रातींच्या अवस्थांच्या प्रकारापैकी तिसऱ्या पैकी प्रकाशात पडणारी म्हणजे वासाहतिक देशातील लोकशाही क्रांती आहे. या क्रांतीच्या अवस्थेतील रशियन क्रांतीच्या अवस्थेशी तुलना करणे चूक आहे कारण क्रांतीपूर्व रशिया हा मागासलेला परंतु भांडवलसाम्राज्य देश होता. उलट रशिया हिंदूस्थानापेक्षा निराळया प्रकारचा व निराळया वर्गात मोडणार पुढारलेला देश होता असे मानणे चुक आहे. तसेच हिंदुस्थान व क्रांतीपूर्व रशिया यांच्यात औद्योगिक विकासाच्या बाबतीत कोणतीही भिन्नता असली तरी ती गुणात्मक स्वरूपाची नाही असे म्हणणे म्हणजे मार्क्स-लेनिवादाला ट्रॉटस्कीवादी विकृत स्वरूप देणेच आहे.

२) त्याचप्रमाणे हिंदी क्रांतीतील निरनिराळया वर्गाच्या स्थानाचे विवेचन करताना शेतकऱ्यांचे हिंदी कामगारांचा अत्यंत डळमळीत मित्र असे केले. वसाहतिक क्रांतीमध्ये मध्यम शेतकरी कामगार वर्गाचा दोस्त असतो हा लेनिन-स्टॅलिनवादी सिध्दांत लाथाडून मध्यम शेतकऱ्यांचे वरीलप्रमाणे वर्णन करताना कम्युनिस्ट पुढारीपणाने कामगार वर्गाचा मित्र गमावण्याची परिस्थिती निर्माण केली.

३) वाढत्या क्रांतीकारक डावपेंचाचा अवलंब करण्याची आवश्यकता प्रतिपादन करताना हे पुढारीपण म्हणते की. क्रांतीच्या लढ्यात सुरूवात प्रथमःत क्रांतीशक्ती दुभंगलेल्या असतानाच होत आहे.क्रांतीच्या उठावाचे बावतीत सर्वसाधारण जनता, कमीत कमी सहानूभुतीची तटस्थता स्वीकारण्यास तयार असल्यावाचून क्रांतीचे बोलणे शुध्द साहस आहे. हे चुकीचे विधान करून पक्षाच्या पुढारीपणाने तुरुंगातील लढ्याचे तंत्र शोधून काढले व लेनिन-स्टॅलिनच्या विरुध्द आहे.

४) हिंदी परिस्थिती प्रत्यक्ष क्रांतीकारक उठावापर्यंत जाऊन पोहंचली आहे असे राजकीय जागृतीबाबत विधान करून पक्षाच्या पुढारीपणाने क्रांतीलढा बऱ्याच वरच्या अवस्थेला पोहचल्यानंतर अमलात आणावयाचे लढ्याचे मार्ग स्वीकारले.म्हणून त्यांना कामगार वर्गाने व जनतेने पाठींबा दिला नाही.

५) कामगारांचा काही भाग इन्टकमध्ये काही सोशॅलिस्ट पुढारीपणाच्या वर्चस्वाखाली, बराचसा भाग असंघटित असताना हिंदी परिस्थिती क्रांतीकारक उठावापर्यंत जाऊन पोहचली आहे. असे समजणे म्हणजे आपली जागृती जनतेवर लादणे होय. परंतु पक्षाची जागृती जनतेवर लादल्याने जनता जागृत होत नाही. ही घोषणा म्हणजे जहाल तंत्र होय. जहाल घोषणा केल्याने जनता पक्षाच्यामागे जात नाही. जनतेला आपल्या अनुभवातून कळावे लागते. त्याचे आर्थिक व राजकीय लढे लढविताना धीमेपणाने तिला क्रांतीकारक शिकवण देण्याचे सोडून कम्युनिस्ट पक्षाचे पुढारीपण केवळ अवास्तव घोषणा करीत आहे. व स्टॅलीन-लेनिन इंटरनॅशनल कम्युनिस्टांना धाब्यावर बसवत आहे. त्यामुळे इंटरनॅशनलच्या कार्यक्रमात स्पष्ट इशारा दिला. नव्या व जहाल घोषणांची मजल मारताना पार्टीने लेनिनवादाच्या राजकीय डावपेचांची मुलभूत भुमिका लक्षात घेवून आपली दिशा ठरवली

पाहिजे.पार्टीच्या धोरणाच्या बिनचूकपणाविषयी बहुजन समाजाला स्वतःच्या अनुभवानेच ज्यामुळे खात्री पटेल अशा रितीने बहुजन समाजाला क्रांतीकारक भुमिकेपर्यंत नेऊन पोहचविण्यात नेतृत्व करण्याची लायकी हा या डावपेचाचा गाभा आहे.

कम्युनिस्ट पक्ष पुढारीपणाने जरी अशी धोक्याची परिस्थिती निर्माण करत असला तरी हिंदी क्रांतीच्या मोर्चातील कम्युनिस्ट पक्षाच्या स्थानाचा विचार करताहा पक्ष लोकशाही क्रांतीच्या मोर्चात सामील होणे आवश्यक आहे. असेच या पक्षाचे मत आहे. कॉनिनफॉर्मच्या सडेतोड मार्गदर्शनानंतर पक्षाच्या धोरणात बदल होणे ही गोष्ट सुलभ झाली आहे. ज्याप्रमाणात हे कार्य यशस्वी होईल त्याप्रमाणात एकंदर हिंदी क्रांतीचा मोर्चा जोरदार होण्यास मौलिक मदत होईल

शेतकरी कामगार पक्षाने कम्युनिस्टावर प्रबंधात परखड टीका केली आहे. इंटरनॅशनल कम्युनिस्टांनी दिलेल्या वर्गीय लढ्याच्या आदेशाचे पलान न केल्यामुळे बहुजन समज़ापासून हिंदी कम्युनिस्ट वेगळा होऊन राष्ट्रीय चळवळीपासूनही दूर पडला. त्यामुळे सवलतीचे राजकारण कॉंग्रेसने केले व जनतेला वर्गीय दृष्टीकोन येऊ शकला नाही. जनतेवर भांडवली राष्ट्रवाद अखंडपणे कायम राहिला. दुसऱ्या महायुध्दात इंटरनॅशनल कम्युनिटीचा आदेश झुगारूत भौतिक परिस्थिती निर्माण होऊनही फायदा घेता आला नाही. त्यामुळे हा पक्ष लोकयुध्दापासून शेतकऱ्यांच्या लेव्ही प्रश्नापासून चलेजाव , प्रतिसरकारपासून विरोधी भूमिका घेऊन अलग राहिला. व त्यामुळे भांडवली पुढारपणाला वाव मिळून समाजवादी पक्ष अस्तित्वात आला. दुसऱ्या महायुध्दानंतर चुकीचे डावपेच, धोरण, व्युहरचना स्वीकारून ऐतहासिक जबाबदारीपासून दूर राहिला. जनतेचा लढा लोकशाहीसाठी नसून कामगारांच्या हुकूमशाहीसाठी आहे. शेतकऱ्यांना डळमळीत मित्र, एकतर्फी व साहसी तंत्र अवलंबून जनतेच्या राजकीय जागृतीचे चुकीची धोरणे स्वीकारल्याने भांडवली साम्राज्यवाद्यांना आपले धोरण पुढे रेटता आले. एखाद्या पक्षाने केवळ जहाल घोषणा केल्याने जनता त्या पक्षाच्या मागे जात नाही. या चुकीच्या घोषणा दिल्या. प्रबंधकर्त्यांनी अशी टीका केली.

## २.४ समाजवादी पक्षाचे सत्य स्वरूप

समाजवादी पक्ष अस्तित्वात असताना शेतकरी कामगार पक्ष का स्थापन करण्यात आला व समाजवादी पक्षाबरोबर कोणते तात्विक मतभेद आहेत याचे स्पष्टीकरण शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंधात या शिर्षकात केले आहे.

कम्यनिस्टप्रमाणेच हिंदी लोकशाही लढ्याचा विचका करण्यासाठी जबाबदारी समाजवाद्यांवरही आहे. स्वतः मार्क्सवादी म्हणत असला तरी तो पक्ष मार्क्सवादी नाही. मार्क्सवाद मान्य नसल्याने आजच्या हिंदी क्रांतीचे स्वरूप, त्यातील निरनिराळया वर्गाचे स्थान, क्रांतीलढ्याची व्यूहरचना, डावपेच या बाबतीत साम्यवादाला धरून हा पक्ष योजना करीत नाही. त्यामुळे त्यांचे आजच्या परिस्थितीविषयी निदान चुकीचे आहे. जगाची विभागणी दोन गटात होते.एक साम्राज्यवाद्यांचा गट व दुसरा लोकशाहीवाद्यांचा आहे. लोकशाहीवाद्यांचे पुढारीपण सो. रशियाकडे आहे. परंतु समाजवादी पक्ष सो.रशियाला लाल साम्राज्यशाही असे संबोधून तिच्याविषयी विघातक व विकृत भूमिका घेत आहे. अमेरिका व सोव्हिएट रशिया हे एकाच रांगेत आहेत असे समाजवादी पुढारीपण मानतात व अमेरिकेचा दोस्त ब्रिटन जवळचा आहे. प्रतिगामी राजवटींना चिरडून टाकणाऱ्या ब्रिटनने मजूर सरकार साम्राज्यवाद्यांच्या दुष्टीने पुरोगामी आहे. ब्रिटनला पाठिंबा देणे म्हणजे अमेरिकन गटाला पाठिंबा देणे होय. हीच गोष्ट समाजवादी पक्षाचे पुढारी करत आहेत. त्यांच्या धोरणामुळे लोकशाही क्रांतीच्या मोर्चात सतत फाटाफूट होत आहे. तिसऱ्या गटाची योजनाही समाजवादी पक्षाच्या मनात सो.रशियाबद्दल कडव्या भावना आहेत. त्यामुळे हा पक्ष कम्युनिस्ट पक्षाचे बाबतीत शत्रुत्वाची भुमिका घेत आहे. लोकशाही क्रांतीसाठीच्या एकजूटीसाठी समाजवादी म्हणतात. काही झाले तरी कम्युनिस्टांचे बरोबर आम्ही सहकार्य करणार नाही या भुमिकेमुळे लोकशाही क्रांतीच्या एकजूटीत समजावादी अडथळे आणत असून एक प्रकारे भांडवलशाही राष्ट्रांना मदत करत आहे. त्यामुळे कम्यनिस्टाला शत्रू मानून अमेरिकेच्या धोरणास अजाणतेपणाने पाठिंबा दिलेल्या हिंदी लोकशाही क्रांतीस विरोध ठरतो. हेच धोरण समाजवादी पक्षाचे पुढारीपण अंमलात आणत आहे.

समाजवादी पक्ष आपले ध्येय कम्युनिझम शत्रू मानून लोकशाही समाजवाद मानतात आणि ते करत असताना साधनांच्या शुचितेवर भर देतात. मार्क्सवादाची शिकवण भांडवली व लोकशाहीचा हा पडदा भांडवलदाराची हुकूमशाही जनतेपासून लपविण्याचे कामीच उपयोगी पडतो आहे. म्हणूनच भांडवलशाहीच्या चौकटीत नसून कामगारांचे, शेतकऱ्यांचे राज्याची घोषणा करणे म्हणजे जनतेची फसवणूक करणे होय. हिंदूस्थानमधील भांडवली सरकार जनतेची पिळवणूक करित असताना जनतेला पावलोपावली भांडवली लोकशाहीचे धडे देणे म्हणजे कॉंग्रेस सरकारने लोकशाहीच्या नावावर जी हूकुमशाही चालविली तिला अमरपद देण्यासारखेच आहे. आणि नेमकी ही गोष्ट समाजवादी पुढारी करत आहेत. तसेच भांडवलदारी अर्थव्यवस्थेतील विषमता नष्ट करण्यासाठी क्रांतीच्या मार्गाऐवजी समाजवादी पक्ष भांडवलाच्या विकेंद्रीकरणाचा उपाय सुचवितात व भांडवलाच्या राष्ट्रीयीकरणाच्या नव्या अभिनव योजना पुढे मांडतात असे करण्याने क्रांतीकारक मार्गाचा ते त्यागच करतात. स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचा तिसरा गट ब्रिटीश व फ्रेंच समाजवादी (मजूर) सरकारच्या सहाकार्याने घडवून आणणे आवश्यक आहे असे या पुढाऱ्यांचे मत आहे. या मतामुळे साम्राज्यवादी राष्ट्रे वसाहतीमध्ये आपल्या ऐत्तद्देशीय हस्तकांना हाती धरून जो सत्तांतराचा देखावा निर्माण करतात. त्याबाबत जनतेच्या मनात तिला निष्क्रीय बनविणारा भ्रम निर्माण करून पुढारी फाटाफुटीचे धोरण स्वीकारीत आहेत.

मार्क्सवादाचा वर्गीय दुष्टीकोन या पक्षाला मान्य नसल्याने कामगार वर्गातच व क्रांतीमध्ये फाटाफूट पाडणारे आहे. म्हणून समाजवादी पुढारीपण कामगारांचे नसून मध्यमवर्गियांचे आहे हे दिसून येते. कामगार वर्गात वाईट दृष्टीकोन स्वीकारून औद्योगिक शांततेच्या कॉंग्रेसच्या धोरणाला भांडवलशाही घोषणेला पाठिंबा दिला होता व कामगारांना बेकारी पत्करण्याऐवजी कमी पगारावर नोकऱ्या करण्याचा उपदेश केला. तसेच सहकारी संस्था विश्वासात ठेवून क्रांतीकारक मार्गापासून कामगारांना समाजवादी दूरच ठेवतात. याच धोरणाचा अवलंब करून स्वतःची कामगार युनियन स्थापन करून प्रत्यक्षात कामगारात फूट पाडली. व साम्राज्यवादांनी जागतिक संघटनेला पाठिंबा दिला. म्हणूनच समाजवाद्यांचे हे धोरण देशात कामगारांत दुही निर्माण करणारे होते. याचाच अर्थ असा होतो की समाजवाद्यांनी मार्क्सवादाला जो विरोध केला व लोकशाही क्रांतीला विरोधी धोरण पत्करला

त्याला कारण म्हणजे समाजवादी पुढारी हे मध्यमवर्गीय होते व शांततेच्या गांधीवादाचे अनुयायी होते.

म्हणूनच शेतकरी कामगार पक्ष दाभाडी प्रबंधात म्हणतो या समाजवादी पुढारपणाने लोकशाही धोरणाची घोषणा करीत भांडवली सरकारला प्रसन्न करून घेण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्याचा उपयोग होणार नाही. अंर्तगत व बहिर्गत परिस्थितीमुळे कॉंग्रेस सरकार हूकुमशाही धोरण स्वीकारत आहे व त्यात कामगार गरीब मध्यमवर्ग, शेतकरी, भरडले जात आहेत. यासाठी क्रांतीकारक मार्गाचा स्वीकार करण्याकडे समाजवादी पुढाऱ्यांचे लक्षही जात नाही. दडपणाखालीच समाजवादी पुढारीपणाने बंगलोरच्या बैठकीत आवश्यक झाल्यास सशस्त्र उठावाच्या मार्गाचाही पुरस्कार केला आहे. समाजवादी पक्षात सामिल झालेले कामगार, शेतकरी, गरीब मध्यमवर्गीय या सर्वांनी आपल्या प्रत्यक्ष आचाराने आपल्या कचखाऊ पुढाऱ्यांना कणखर क्रांतीकारक असे धोरण स्वीकारण्यास भाग पाडणे जरूरी आहे. असा सल्ला प्रबंधकर्ते समाजवादी संघटनाना देतात.

प्रबंधकर्त्यांनी हिंदी कम्युनिस्टाप्रमाणे समाजवाद्यावर टीका केलेली दिसून येते. स्वत:ला कम्युनिस्ट पक्ष म्हणून संबोधताना अनेक चुका या पक्षाने केलेल्या दिसतात. क्रांतीकारक लढ्याची व्यहरचना व डावपेच इंटरनॅशनल कम्युनिस्टांच्या विरोधी भुमिका स्विकारली व त्यांचे मार्गदर्शन मानीत नाही. रशियाला लाल-साम्राज्यशाही संबोधले, अमेरिक न साम्राज्यवाद्यांना जवळ केले . कम्युनिझम ऐवजी लोकशाही समाजवाद्यांची भूमिका , पाकिस्तान विरोधी विकृत शत्रुत्त्वाचा पुरस्कार केला, मार्क्सच्या मुलभूत वर्गीय दृष्टीकोनापासून दूर राहिले, कम्युनिस्ट पक्षाला प्रमूख शत्रू मानले. क्रांती ऐवजी विकेंद्रीकरण भांडवलदारीचा स्वीकारला इ. चुकीच्या भुमिका इंटरनॅशनल व हिंदी कम्युनिस्टापासून घेतल्याने आम्ही कम्युनिस्ट पक्ष आहोत हे चुकीचे वाटते. कम्युनिस्ट व समाजवाद्यांच्याय चुकीच्या धोरणामुळे शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंध स्विकारून लेनिन-स्टॅलिन यांचे पुरस्कार केला .

## २.५ शेतकरी कामगार पक्षाचा जन्म व कार्य

शेतकरी कामगार पक्षाची वैचारिकता दाभाडी प्रबंधातील या घटकातही दिसून येते. हिंदी कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या चुकांचा आढावा आपण सविस्तर घेतला. त्यांनी केलेल्या चुकांमुळे शेतकरी कामगार पक्ष किसान-कामगारांवर येऊ घातलेल्या संकटाला अडवण्यासाठी व वर्गीय लढ्याची क्रांती घडवून आणण्यासाठी पक्ष स्थापल्यापासून या धोरणाचा स्वीकार केला असे दाभाडी प्रबंधात स्पष्ट केले आहे.

कम्युनिस्ट पक्ष अनेक चुका करून राष्ट्रीय स्वातंत्र्य युध्दाला पाठमोरा झाल्यामुळे देशातील कामगार किसान हा काँग्रेसच्या भांडवलदारी पुढारीपणाच्या मागे होता.कम्युनिस्टांच्या चुकांमुळे काँग्रेसशी केलेल्या समझोत्यामुळे जागे झालेल्या काही कार्यकर्त्यांचा गट किसान-कामगारांवर येऊ घातलेल्या संकटाला थोपवून धरण्यासाठी वर्गीय लढ्याच्या आधारे पुढील क्रांती घडवून आणण्यासाठी पक्ष स्थापून पुढे आला. काँग्रेसचे पुढारी ब्रिटीश साम्राज्यशाहीशी हातमिळवणी करण्याच्या धोरणामुळे हिंदुस्थानच्या क्रांतीकारक चळवळीतील महाराष्ट्रातील क्रांतीकारक विभागाची प्रक्रिया म्हणजेच शे.का.प चा जन्म होय महाराष्ट्रातील कामगार शेतकऱ्यांची परंपरा क्रांतीकारक साम्राज्यशाही विरोधी राष्टीय लढ्यात पक्ष बेडरपणे सामील झाला. व त्यातूनच साताऱ्याची पत्री सरकारची चळवळ निर्माण झाली. काँग्रेसचे भांडवली पुढारीपण प्रत्यक्षात साम्राज्यशाहीशी हातमिळवणी करून प्रतिक्रांतीकारक बनत असल्याच्या काळात महाराष्ट्रातील कामगार शेतकऱ्यांच्या साम्राज्यविरोधी चळवळीच्या एकत्रित अनुभवातून शेतकरी कामगार पक्षाच्या जन्माला कारणीभूत होणारी प्रेरणा मिळाली व महाराष्ट्रातील विशिष्ट साम्राज्यशाही विरोधी वैठक पक्ष स्थापनेला कारणीभूत आहे. १९३० ते १९३३ ,१९३९ व १९४२ या साम्राज्यशाही विरोधी जनतेच्या लढ्यात हिरीरीने भाग घेतला. संयुक्त महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचा हा पक्ष आहे. हिंदुस्थानात जे साम्राज्यशाही विरोधी झगडे झाले त्यातील महाराष्ट्रातील अत्यंत विशुध्द स्वरूपातील क्रांतीकारक विभाग शेतकरी कामगार पक्षाचा गाभा आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात व नंतर काळात पक्षाच्या अनुभवातून मार्क्सकडे वाटचाल केल्याचेही पक्ष स्पष्ट करतो.

आपण मार्क्सवादाचे मार्क्स, एंजल्स, लेनिन, स्टॅलिन यांचे ग्रंथ आधारभूत मानून इंटरनॅशनल व कॉमिनफॉर्म या जागतिक कम्युनिस्ट चळवळीचे सिध्दांत व मार्गदर्शन आत्मसात करून मार्क्सवादी-लेनिनवादी बनलो आहोत. या खंबीर भुमिकेवरून लोकशाही क्रांतीच्या मोर्चा पुढे नेण्याचा शिकस्तीचे प्रयत्न करीत आहोत.

कम्युनिस्टांनी व समाजवाद्यांनी पक्षाच्या धोरणावर आरोप केल. ते मागे पाहिले आहे. तसेच शेतकरी कामगार पक्ष जन्म कसा झाला. स्थापनेपूर्वीच्या महत्वाच्या घटना याही सविस्तर घेतलेल्या आहेत. त्यातूनच पक्षाने जनतेच्या क्रांतीकारक लढ्याने साम्राज्यशाही विरोधी चळवळ निर्माण करण्याचे प्रयत्न व मार्क्सवादाचे तत्वज्ञान स्वीकारण्याचे व जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम शे.का.प. ने केले.

जन्मापासून पक्षाने मार्क्सवादाचे तत्वज्ञान लाखो श्रमजीवी जनतेपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य केले. कम्युनिस्ट पक्षाच्या चुकीच्या धोरणामुळे जनतेच्या मनात मार्क्सवादाविषयी तटस्थता निर्माण झाली होती. ती दूर करून उलट या तत्वाविषयी आस्था निर्माण केली. सो. रशिया बद्दलची तटस्थेची भुमिका टाकून देऊन श्रमजीवी जनतेचा क्रांतीकारक लढा सो. रशियाच्या पुढारपणाखाली मोर्चामध्ये आणून उभे करण्याच्या प्रयत्नांत पक्षाने यश मिळवले. व लोकशाही क्रांतीसाठी लढाऊ मोर्चा निर्माण करण्याचे मार्गावर प्रगती करण्याचा प्रयत्नात आहोत. सोलापूरच्या अधिवेशनानंतर जनतेच्या लोकशाही क्रांतीसाठी उभारण्याच्या मोर्चाच्या घोषणेत क्रांतीकारक गटाची एकजूट या घोषणेला पक्षाने अत्यंत महत्वाचे स्थान दिले. त्यातूनच सोशॅलिस्ट रिपब्लीकन पक्षाचे अध्यक्ष कै. शरदचंद्र बोस यांचे मदतीने भारतीय संयुक्त समाजवादी परिषदेची स्थापना करून हिंदुस्थानातील सर्व क्रांतीकारक शक्ती एकत्रित करण्याचे महत्वाची कामगिरी केली पण कम्युनिस्ट व समाजवादी पक्षाने आपले धोरण न बदल्यामुळे संयुक्त आघाडीत समावेश होऊ शकला नाही.

कुलाबा व नगरच्या निवडणुकीत पक्षाने विजय मिळवून भांडवली राज्यव्यवस्थेत निवडणुकीला किती अर्थ असतो हे दाखवून दिले . या काळात वर्गीय संघटना करण्याचा व त्यांत एकजूट निर्माण करण्याच्या प्रयत्नातून हिंदू मजूर सभा व इन्टक यांनी कामगार वर्गात जी फूट पाडली ती नष्ट करण्याचे कार्य ओगलेवाडी जि.सातारा कामगारांत पक्षाने यशस्वी रीतीने पार पाडली सोलापूर गिरणी बंद झाल्याने जो लढा निर्माण झाला त्यात

कम्युनिस्ट व समाजवादी यांची संयुक्त आघाडी उभारण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने स्वतंत्रपणे लढा दिला व १७५ कामगारांना पकडण्यात आले. मे दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. राधानगरी कामगारांच्या पगारवाढीसाठी लढा व मुंबईच्या म्युनिसीपल कामगारांच्या पक्षाने महत्वाची भुमिका वजावली. संपूर्ण महाराष्ट्रातील क्रांतीकारक एकजूट घडवण्याचे ठरविले. १९४८ मध्ये कोवाड . जि.वेळगाव येथे शेतकरी परिषदा घेऊन कामाला प्रारंभ केला व महाराष्ट्रात परिषदेमार्फत शेतकऱ्यांच्या अडचणींना वाचा फोडली, गुजराथ व महाराष्ट्रातील सरकारी धान्याच्या भावातील तफावतीविरुध्द इगतपुरी तालुक्यात हा प्रश्न धसास लावताना सरकारी भावाने धान्य न विकण्याचे ठरवून ८७ गावपाटलांचे राजीनामे सादर केले. त्याने १४४ कलम लावल्याने ४६६ शेतकरी स्त्रियांना तुरूंगात डांवले. कुलाबा जिल्हयातील भाताचे पीक दुष्काळाने बुडाल्यामुळे पक्षाने मोठे कार्य केले. लेव्ही वसुली जुलुमाविरुध्द सभा परिषदा भरवून जनतेला संघटित करण्याचा प्रयत्न केला. लेव्हीच्या जाचाविरुध्द मराठवाडयात जनतेला संघटित मोर्चा उभारण्याचा प्रयत्न फक्त शे.का.प.ने केला त्यातच दडपशाहीचे धोरण स्विकारून पक्षाच्या अनेकांना त्यांना तुरंगात डांवले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कॉंग्रेसचे ढोंगीपणा सभा परिषद घेऊन जनतेसमोर मांडला. या प्रश्नाला चांगली चालना देण्याचा मान पक्षाने मिळवला. पक्षाच्या असेंव्लीच्या सभास दोन्ही सरकारच्या धोरणास विरोध करून मार्क्सवादी पध्दतीने त्यांचे खरे स्वरूप जनतेसमोर मांडले. याशिवाय मार्क्सवादी पध्दतीने ठिकठिकाणी शिबिरे, मोर्चा, प्रचार परिषदा घेऊन जागृती करण्याचे कार्य केले. या सर्व कामात पक्षाच्या जनसत्ता साप्ताहिकाने फार मोठा वाटा उचलला आहे.

शेतकरी कामगार पक्षाने वरील कार्याचा आढावा घेताना असे लक्षात आले की कम्युनिस्ट व समाजवादी पक्षाच्या कम्युनिझमच्या वाटचालीत वेगळी भुमिका घेतली व पुढील कार्यासाठी लोकशाही क्रांतीचा लढा पुढे नेण्यासाठी या कायाला हिंदी क्रांतीवाद्यांनी कॉमिनफार्मचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. असे दाभाडीमध्ये ठरविले. कॉमिनफार्मच्या मुखपत्राच्या अग्रलेखात असे म्हटले आहे की ,

चिनी जनतेच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या विजयी लढ्याचा अनुभव हे शिकवताना, कामगार वर्गाने साम्राज्यवाद्यांच्या व त्यांच्या हस्तकांविरु ध्द लढण्याला आणि कामगारवर्गाच्या व त्याची आघाडी कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली संयुक्त मोर्चा उभारण्याला तयार असलेल्या सर्व वर्गांशी पक्षांशी, गटांशी व संघटनांशी एकजूट केली पाहिजे. ही कम्युनिस्ट पार्टी मार्क्सवादी लेनिनवादीत तत्वज्ञानाने सज्ज असलेली क्रांतीकारक व्यूहरचना व डावपेच यांचे तंत्र आत्मसात केलेली जनतेच्या शत्रूंना किंचितही दयामाया न दाखविण्याचा क्रांतीकारक बाणा रोमारोमात भिनलेली, जनतेच्या सामुदायिक चळवळीत कामगारवर्गीय संघटना व शिस्त यांचा बाणा दाखवणारी कम्युनिस्ट पार्टी असली पाहिजे. अंतर्गत परिस्थिती ज्या वेळेला अनुकूल असेल त्यावेळेला कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली जनतेची स्वातंत्र्यसेना उभारणे ही राष्ट्रीय स्वातंत्र्य लढा यशस्वी रीतीने तडीला नेण्याची निर्णायक अट आहे. चीन, मलाया, व्हिएट्नाम या परतंत्र व वसाहत देशात सशस्त्र देशात संग्राम राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याचा प्रकार बनत आहे. त्यामुळे साम्राज्यवाद्यांना पीछेहाटीचा पवित्रा घेणे भाग पडले. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊन माऊंटबॅटन कंपनी निघून गेली असलीतरी ब्रिटीश साम्राज्यशाहीचे हितसंबंध पवित्र व अभंग राखण्यात आले.

हिंदूस्थानमधील या परिस्थितीवर कॉमिनफॉर्मच्या मुखपत्रात म्हटंले आहे की चीन व इतर देशातील राष्ट्रीय चळवळीच्या अनुभवाचा त्यांनी उपयोग करून कामगार व शेतकरी वर्गाची दोस्ती भक्कम केली पाहिजे. शेतीविषयक सुधारणा अंमलात आणण्यासाठी लढले पाहिजे. ॲंग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्याविरु ध्द. प्रतिगामी त्यांना सहाय्य करणारे बडे भांडवलदार व सरंजामी संस्थानिका विरुध्द देशाच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वासाठी सर्व वर्गाची, पक्षाची, गटांची व संघटनेची एकजूट उभारली पाहिजे. वसाहतीच्या व परतंत्र देशातील कम्युनिस्ट पक्ष, ट्रेड युनियन्स, व सर्व लोकशाही.संघटना यांनी श्रमिक जनतेची व सर्व पुरोगामी शक्तीची एकजूट उभारली पाहिजे.व प्रतिगाम्यांच्या देशद्रोही भूमिकेचे खरे स्वरूप रोज चव्हाट्यावर मांडले पाहिजे

वसाहतीवर वर्चस्व गाजविणाऱ्या साम्राज्यवाद्यांच्या देशातील कम्युनिस्टांचे कर्तव्य आहे की जनतेला आपल्या देशातील शक्तीचा पाठिंबा मिळवून दिला पाहिजे , त्यासाठी त्या शक्तीची एकजूट उभारली पाहिजे. त्यासाठी स्टॅलिनच्या पुढील शब्दांची आठवण ठेवली

पाहिजे. वसाहतीच्या व परतंत्र देशाची स्वातंत्र्य चळवळ आथिक पुढारलेल्या पाश्चिमात्य देशातील कामगार चळवळ यांच्यात खरा दुवा बांधल्याशिवाय या देशात कायम स्वरूपाचा विजय मिळवणे शक्य नाही. रशिया, चीन व जनतेच्या लोकशाहीचे देश, यातील क्रांतीचा अनुभव शिकवतो की जेव्हा जनता निर्धारपूर्वक लढ्यात उतरते, तेव्हा कम्युनिस्ट पक्ष या लढ्याचे नेतृत्व करायला समर्थ असतात. तेव्हा देशातील अंतर्गत प्रतिक्रांतीच्या व परकीय साम्राज्यवाद्यांच्या कोणत्याही शक्ती क्रांतीच्या मार्गाने जाणाऱ्या बहुजन समाजाला चिरडू शकत नाहीत.

कॉमिनफॉर्मने मार्गदर्शनात हिंदी कम्युनिस्ट पुढारपणाने केलेल्या चुका या कॉमिनफॉर्मच्या विरुध्द असून त्यावरील स्वरुपात बदल्याचे क ॉमिनफॉर्मने हिंदी कम्युनिस्टांना आव्हान केले होते.साम्राज्यशाहीशी हातमिळवणी केल्यामुळे भांडवलदारांचा पाया संपण्याची परिस्थिती असून त्यासाठी क्रांतीकारक गटांबरोबर पक्षांबरोबर, संघटनांबरोबर मर्यादीत स्वरूपाचे सहकार्य करणे आवश्यक आहे. परंतु शे.का.प. म्हणतो की वासहातिक आर्थिक आरिष्ट्याचे जबर ओझे यामुळे हैराण झालेले काही श्रीमंत शेतकरी काही काळापर्यंत मर्यादित स्वरुपाचा क्रांतीकारक वर्गांबरोबर , पक्षांबरोबर व गटांबरोबर सहकार्य करणे शक्य आहे. शत्रूच्या गोटातील प्रत्येक खिंडारचा उपयोग करण्यात स्वत:साठी दोस्त मिळविण्यात (कामगारवर्गाने) कौशल्य दाखविले पाहिजे हे सुत्र आपण कधीही विसरता कामा नये. हिंदुस्थानातील ही आघाडी आपण बळकट केली पाहिजे व साम्राज्यवाद्यांना आणि त्यांच्या हिंदी हस्तकांना आपण नेस्तानाबूत केले पाहिजे

त्यातील हिंदुस्थानमध्ये शेतकरी कामगार पक्षाने पुढील ध्येय धोरणे आखण्याचे ठरवले.

कामगार वर्गाची कणखर लढावू एकजूट उभारून शेतमजुरांची, लहान शेतकऱ्यांची संघटना करून आणि लढे उभारून. मध्यम शेतकऱ्यांचे प्रश्न व्यापक प्रमाणात सोडवून, शिक्षक. परिचारिका व इतर नोकरवर्ग तसेच घरमजुरी करणारे, हमाली करणारे आणि शहरातील इतर व्यवसाय करणारे यांची म्हणजेच पिळल्या जाणाऱ्या श्रमिकांची संघटना करून कामगार, शेतकरी,मध्यमवर्गीय स्त्रियांना संघटित करून आणि आगामी काळात बेकारांचे लढे संघटित करून आपण जनतेचा प्रचंड क्रांतीकारक मोर्चा उभारला पाहिजे. हा

लढाऊ क्रांतीकारक मोर्चा उभारूनच आपण हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लोकशाही लढा पूर्णत्वास नेणे आणि जनतेच्या लोकशाहीचा विजयी झेंडा या देशात डौलाने लवकर फडकविणे शक्य आहे.

समाजवादी व कम्युनिस्ट पक्षाच्या चुकीच्या धोरणाचा अवलंब केल्याने त्यांचे जटळ दूर राहण्याचे दाभाडी प्रबंधात सार ठरवलेले आहे. श्रमजीवी जनतेवर आलेल्या संकटांना थोपवून धरण्यासाठी शे.का.प.ची स्थापन झाली असे प्रबंधात म्हटले आहे. तसेच मार्क्सवादी बनण्यासाठी कॉमिनफॉर्म व मार्क्स लेनिन स्टॅलिन इ.ग्रंथाचे मार्गदर्शन घेण्याचे म्हटले आहे. शे.का.प.ची स्थापन झाल्यानंतरच्या दोन वर्षातील कार्याचा आढावा घेत मार्क्सवादाच्या दिशेने वाटचाल चालू असल्याचेही या प्रबंधात म्हटले आहे व श्रमजीवी जनतेर्यत तत्वज्ञान नेण्याचे कार्य शेतकरी कामगार पक्षाच्या पुढाऱ्यांनी , इतर हिंदी कम्युनिस्टांपेक्षा केल्याचे दिसून येते. डाव्यांच्या एकजूटीसाठी कॉमिनफॉर्मच्या आदेशाचेही पालन करण्याचे शे.का.प.ने जाहीर केले. त्यासाठी सर्व जनतेला संघटित करून लढा देण्याचा कार्यक्रम पक्षाने प्रबंधाद्वारे स्विकारला आहे.

## २.६ पक्षाचे पुढील कार्य

पक्षाच्या वैचारिक आधाराचा एक घटक म्हणून पक्षाचे कार्याचा आढावा घेणे जरूरीचे आहे. त्यासाठी पक्षाने ही एक महत्वाची पुढील काळासाठी जबाबदारी पार पाडण्यासाठी रूपरेषा आखली, जबाबदारू कोणत्या स्वरुपाची आहे या दृष्टीने आखणी कशी करावी हे कोणत्याही संघटना, गट , पक्षाच्या जबाबदारीवर अवलंबून असते. तेव्हा त्यावेळी देशातील परिस्थितीचा विचार करून कार्यक्रम आखला पाहिजे. कोणत्या प्रकारची क्रांती करायची आहे हे प्रबंधकर्त्यांनी या भागात विवेचन केले आहे.

वासाहतिक अर्थव्यवस्थेत निर्माण होणारे देशी उद्योगधंदे व कामगार वर्ग शेतकरी समाजाची वर दिल्याप्रमाणे निरनिराळया वर्गात होत जाणारी विभागणी, बँक भांडवलाचे प्रभुत्व, साम्राज्यशाहीचे आर्थिक, राजकीय, लष्करी प्रभुत्व या परस्पर विरोधी आर्थिक क्रिया अस्तित्वात असतात व यातच साम्राज्यशाही विरोधी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा क्रांतीकारक

चळवळीचा पाया असतो. अशा रीतीने वसाहत देशातले स्वातंत्र्य लढे मुलतः साम्राज्यशाही विरोधी असल्याने ते जागतिक कामगार क्रांतीचा एक भाग असतात.

जागतिक कामगार क्रांती अस्तित्वात येणारी गरज येथे शे.का.प.ने सांगितले व या क्रांतीचे तीन प्रकार स्पष्ट केले तसेच वसाहत देशातील क्रांतीचे कार्य व तीचे स्वरूप कशाप्रकारचे असावे हे ही प्रबंधात स्पष्ट केले.

## क्रांत्यांचे तीन प्रमुख प्रकार

निरनिराळया देशात कामगार वर्ग ज्या भिन्न परिस्थितीत व भिन्न मार्गाने आपली हुकूमशाही प्रस्थापित करील त्याची स्थूलमानाने तीन प्रकारात विभागणी केली.

१. भांडवलशाहीचा विकास उच्च अवस्थेत पोहचला आहे असे देश, अमेरिका, ब्रिटन इ.

२) भांडवलशाहीच्या मध्यम विकास झालेले देश पोलंड, पोर्तुगाल इ.

३) जेथे उद्योगधंद्याची नुकतीच सुरुवात झाली आहे व काही ठिकाणी त्यांचा बराच विकासही झाला आहे. असे वसाहत व निमवसाहत देश उदा: हिंदुस्थान,चीन इ.

वसाहत देशातील क्रांतीचे कार्य एकीकडे सरंजामशाही विरुध्द पिळवणुकीच्या भांडवलशाही पूर्वकालीन प्रकाराविरु ध्द लढणे व शेतकरी क्रांतीचा पध्दतशीरपणे विकास करणे आणि दुसरीकडे परदेशात साम्राज्यशाही विरुध्द राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी झगडणे हे असते.

## वासाहतिक क्रांतीचे स्वरूप

प्रबंधात क्रांतीचे स्वरुप लोकशाही हे स्पष्ट केले आहे व कामगार,शेतकरी, वर्गाची सत्ता स्थापन करणे हे उद्दिष्ट असते असे म्हटले आहे. या क्रांतीत भांडवलदारवर्गाची भुम्िका अतिशय अनिश्चीतता असून क्रांतीची लाट जशीजशी वाढते तसातसा या वर्गाचा डळमळीतपणा वाढतो. शेतकरी क्रांती हा सर्व प्रमुख वसाहत देशातील लोकशाही क्रांतीचा कणा आहे. शेतीची मागासलेली अवस्था, शेतीची वाताहत, खंड वसुलीची जुलमी प्रथा, व्यापारी व सावकारी भांडवलाचा जूलुम यामुळे या देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेतील उत्पादनशक्तीच्या विकासात अडथळा निर्माण होतो. अशा परिस्थितीत शेतीच्या संबंधातील आणीबाणीची स्थिती व खेड्यातील विरोधाची वाढती तीव्रता यांचा लक्षपूर्वक अभ्यास करून

कामगार व शेतकऱ्यांच्या असंतोषास क्रांतीकारक वळण लावणे यांचा रोख साम्राज्यशाही, सरंजामशाही व भांडवलशाही यांच्या विरुध्द वळवणे हे महत्त्वाचे कार्य आहे.

कोणत्याही वासाहत देशात क्रांतीकारक लढ्यात प्रत्येक वर्गाचे हितसंबंध वेगवेगळे असतात. त्यानुसार ते आपले लढे देत असतात. हे वर्गसंबंध कोणत्या प्रकारचे असतात व त्यांना इंटरनॅशनलचे मार्गदर्शन कसे लाभते हे प्रबंधात स्पष्ट केले आहे.

वासाहतिक क्रांतीत निरनिराळ्या वर्गाची भूमिका

**राष्ट्रीय भांडवलदार वर्ग**

इंटरनॅशनल कम्युनिस्टांनी भांडवलदार वर्गाविषयी रव्होल्युशनरी मुव्हमेंट इन दि कॉलनीज अँड सेमी कॉलनीजमध्ये सांगितले की देशी भांडवलदार हे साम्राज्यशाहीमुळे शरणांगती पत्करतात. परंतु जनतेची वर्गीय क्रांती तावडतोब होणार आहे असा तीव्र धोका जोप्रर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत ही शरणागती अखेरची ठरत नाही. भांडवलदारी राष्ट्रवादी चळवळ ही संधीसाधू चळवळ आहे. तिच्यात अतिशय डळमळीतपणा असतो ती साम्राज्यशाही क्रांती या दोन्ही दगडीवर हात ठेवून चालते.साम्राज्यशाही बरोबर प्रत्येक लढ्यात भांडवलदार वर्ग एकाबाजूला आपल्या राष्ट्रवादी खंबीरपणाचा खूप मोठा देखावा करण्याचा प्रयत्न करतो आणि दुसऱ्या बाजूला शांततेच्या मार्गाने तडजोडीच्या शक्यता असल्याचा भ्रम पसरवतो.

या सिध्दांताच आधार घेताना भांडवलदार वर्गाविषयी शे.का.प. विवेचन करताना प्रबंधात म्हणतो की साम्राज्यवादी विरुध्द आपले आसन बळकट करण्यासाठी राष्ट्रीय भांडवलदार वर्ग शब्दावडंबराच्या या योगाने मध्यमवर्गिय जनतेस आपल्या प्रभावाखाली आणंतो.त्यात शेतकरी व कामगार वर्गाचाही समावेश असतो. परंतु कामगार व शेतकऱ्यांच्या क्रांतीकारक उठावांची तीव्रता जो-जो वाढत जाते तो-तो राष्ट्रीय भांडवलदार वर्गाचा डळमळीतपणा वाढत जावून राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या आघाडीचा विश्वासघात करून तो साम्राज्यशाहीचा हस्तक बनतो. साम्राज्यशाहीशी हातमिळवणी केल्यानंतर स्वतंत्र राज्य निर्माण होते. त्याविषयी लेनिन १९२० साली दुसऱ्या काँग्रेसमध्ये म्हणतात औद्योगिक, आर्थिक व लष्करी दृष्ट्या संपूर्णपणे साम्राज्यशाहीवर अवलंबून असलेले राज्य असते.

**कामगार वर्ग**

शे.का.प. प्रवधात कामगार वर्गाविषयी म्हणतो साम्राज्यशाही विरोधी राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या क्रांतीकारक लढ्यात कामगार वर्गास ऐतिहासिक महत्वाचे कार्य पार पाडावे लागते. ह्याचमुळे लेनिन, स्टॅलिम, तसेच कम्युनिस्ट इंटरनॅशनलनी यांनी वसाहत देशातील स्वातंत्र्याच्या लढ्यात कामगार वर्गाचे पुढारीपण प्रस्थापित करा असे प्रतिपादन केले आहे. स्टॅलिन १९२५ साली म्हणतो हिंदुस्थानात भांडवलीशाहीची प्रगती झाली आहे. कामगारांची संख्या बरीच मोठी आहे

पौर्वात्य देशातील श्रमिकांच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमोर भाषणात १९२५ साली स्टॅलीन म्हणतो हिंदुस्थानसारख्या वसाहत देशातील कामगार वर्गाला स्वातंत्र्य चळवळीच्या पुढारीपणाची भुमिका घेण्यासाठी तयार करणे आणि त्या सन्मानीय पदावरून भांडवलारांना व त्यांच्या पुरसकर्त्यांना पायरी पायरीवरून हुसकून लावतो असा प्रश्न आहे. एक साम्राज्यवादी विरोधी क्रांतीकारक संयुक्त गट निर्माण करणे व संयुक्त गटामध्ये कामगार वर्गाचे पुढारीपण हमखास प्रस्थापित करणे हे कार्य आहे

कामगार वर्गाच्या क्रांतीविषयी भूमिका स्पष्ट करताना भांडवलदार वर्गाची त्याविषयी भुमिका वेगळी असते. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या ठरावात स्पष्ट शब्दात भांडवलदार वर्गाविषयी इशारा दिला की भांडवली राष्ट्रीय सुधारणावादाचे मध्यमवर्गावर , शेतकरी जनतेवर आणि कामगार वर्गाच्या काही भागाला,चळवळीच्या पहिल्या अवस्थेत तरी निदान जे वजन असते त्यामुळे त्याला सरंजामदारी साम्राज्यशाही गटापेक्षा निराळेच महत्त्व प्राप्त होते. या गोष्टीचे जर कमी महत्व प्राप्त झाले तर त्यामुळे जहाल पंथप्रवृत्तीचे धोरण आखले जाऊन कम्युनिस्ट पक्ष जनतेपासून अलग पडतो.

शेतकरी वर्ग

शेतकरी वर्ग हा कामगाराचा सहकारीच असतो. त्याविषयी रव्होल्युशनरी मुव्हमेंट इन दि कॉलनीज अँड सेमी कॅालनीजमध्ये वसाहत देशात शेतकरी वर्ग जेव्हा एकजिनसी नसतो अशा परिस्थितीत सर्वसाधारण मानाने पाहता शेतकरी वर्गाच्या जमीनदार विरोधी लढ्याच्या पहिल्या कालखंडात कामगार वर्ग सगळया शेतकरी वर्गाला आपल्याबरोबर

नेण्याची शक्यता असते. लढ्याचा अधिक विकास झाल्यावर शेतकरी वर्गाचे काही वरेच थर प्रतीक्रांतीच्या छावणीत सामील होण्याचा संभव असतो असे म्हटले आहे.

वहुसंख्य शेतमजुर, गरीव शेतकरी मध्यम शेतकरी वर्गाचे कामगार वर्ग शेतकरी वर्गाचे पुढारपणाची भूमिका घेऊ शकतो. त्यासाठी शेतीच्या क्षेत्रातील सर्व प्रश्नांची क्रांतीकारक स्वरूपाने मदत करावी लागेल.

**मध्यमवर्ग**

यामध्ये निरनिराळे गट असतात व ते आपल्या भुमिका वेगवेगळ्या मांडत असतात.

मध्यमवर्गीय वुध्दीजीवी लोक क्रांतीलढ्यात मध्यमर्गीयांचे प्रतिनिधित्व करतात. ज्या सामाजिक स्तरातून हे लोक येतात तो थर जमीनदार वर्गाशी निगडीत असल्याने तो शेतकरी वर्गाच्या हितसंबंधाना पाठिंबा देत नाही. उलट भांडवली राष्ट्रवादाकडे जोराने झुकतात. राष्टीय चळवळीच्या पहिल्या अवस्थेत हे चळवळीच्या लाटेवर प्रामुख्याने दिसतात. क्रांतीच्या उसळीवरोवर या वर्गातील काही लोक कामगार चळवळीत फेकले जाण्याचा संभव असतो. आजच्या परिस्थितीत मार्क्सवादी पक्षाने वस्तुनिष्ठ भुमिका घेऊन व केवळ जहाल घोषणा देऊन क्रांती होत नाही हे लक्षात घेऊन आपला कार्यक्रम आखला पाहिजे. या कार्यक्रमाची पुढीलप्रमाणे आखणी करणे शक्य आहे. राजकीय व आर्थिक परिस्थितीत मूलभुत फरक घडवून आणल्याशिवाय सर्वसाधारण जनतेला स्वातंत्र्य व सुवत्ता यांचा लाभ आपल्या देशात होणार नाही. त्यासाठी लोकशाही क्रांतीचा कार्यक्रम खालील प्रमुख गोष्टींचा उल्लेख करता येईल.

१. विटीश साम्राज्यशाहीशी असलेले सर्व संवंध तोडून टाकून संपूर्ण स्वातंत्र्य प्रस्थापित करणे.

२. अँग्लो-अमेरिकन साम्राज्यशाहीला विरोध करणाऱ्या व शांत आघाडीत सामील असलेल्या कामगार, शेतकरी आणि पिळला गेलेला मध्यमवर्ग यांचे लोकशाही सरकार प्रस्थापित करणे.

३. जनतेला संपूर्ण स्वातंत्र्य व लोकशाही यांचे अधिकार देणारी आणि मुलभूत आर्थिक हक्कांना सरंक्षण देणारी घटना तयार करणे.

४. राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला मान्यता देणे, भाषेच्या पायावर हिंदुस्थानची पुर्नघटना करणे.

५. अल्पसंख्याकांची भाषा, संस्कृती इ.ना.घटनेने सरंक्षण देणे.

६. राजेशाही व सरंजामदारीचे अवशेष नष्ट करणे.

७. सर्व तऱ्हेच्या आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक दडपशाही नष्ट करणे.

८. हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन्ही देशातील श्रमजीवी जनतेच्या प्रगतीच्या हिताच्या दृष्टीने या दोन्ही राष्ट्रांनी परस्पर सहाय्य करणे.

९. काहीही मोबदला न देता जमीनदारी नष्ट करून जमिनीची फेवाहणी करण, शेतकऱ्यांचे कर्ज व सावकारी नष्ट करणे , शेतमजुराला पुरेसे जीवन वेतन देणे.

१०. बँका उद्योगधंदे, वाहतुकीची साधने, मळे , खाणी इ. निरनिराळया व्यवसायात गुंतविलेले परकीय भांडवल जप्त करणे.

११. मोठे-मोठे धंदे, बँका, इन्शुरन्स कंपन्या या राष्ट्रांच्या मालकीच्या करणे, त्यावर कामगारांचे अधिकार राहतील अशी व्यवस्था करणे कामगाराला पुरेसे जीवन वेतन सात तासाचा दिवस, वृध्दपणी पेन्शन, आजारपणात भत्ता, इ. प्रत्येकाला काम मिळवण्याचा हक्क असणे.

१२. प्रत्येकाला काम मिळवण्याचा हक्क असणे.

१३. खाजगी धंद्याच्या नफ्यावर नियंत्रण.

१४. दडपशाहीचे सर्व कायदे रद्द करणे.

१५. नोकरशाही नष्ट करून त्याच्या जागी निवडल्या जाणाऱ्या व त्यांना परत बोलाविण्याचा अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांची नेमणुका करणे.

१६ सर्वांना शस्त्रे वापरण्याचा हक्क देणे व जनता लष्कराची निर्मिती.

१७. प्राथमिक व दुय्यम शिक्षण सक्तीने व फुकट करणे, उच्च शिक्षणाचा बोजा कमी करणे.

१८.स्त्रियांना समान हक्क, समान कामास समान वेतन, हे तत्त्व अमलात आणणे.

हा कार्यक्रम डोळयासमोर ठेवूनच आपले निरनिराळया आघाडीवरचे कार्य ठरवले पाहिजे.

वसाहातिक देशात साम्राज्यशाही विरोधात आघाडया आहेत. या निरनिराळ्या आघाड्याचे तत्व निराळेच असते त्यानुसार त्यांचे कार्यक्रम व कार्य शेतकरी कामगार पक्षाने प्रबंधात दिले आहे.

**कामगार आघाडी**

कम्युनिस्ट पक्षाच्या इन्फर्मेशन ब्यरोने नोव्हेंबर १९४९ च्या अधिवेशनात मंजूर केलेल्या रिपोर्ट व ठरावात अहवाल सादर करताना कॉ. टॉग्लियाही याने असे सांगितले की, सर्व कम्युनिस्ट पक्षाचेच नव्हे तर कामगार (Workers Party) समाजवादी पक्षातील डावे गट यांचे कर्तव्य हे आहे की,साम्राज्यशाहीचे नवे युध्द पेटविण्याचे धोरण हाणून पाडण्यासाठी, नागरिक स्वातंत्र्याचा नाश थांबविण्यसाठी आणि कामगार वर्गाचे जीवनमान कायम ठेवून वाढविण्यासाठी, आवश्यक असलेल्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कामगार वर्गाची एकजूट ही पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त महत्वाची आहे. प्रत्येक देशावर होणारे साम्राज्यशाहीचे हल्ले परतून लावण्यासाठी कामगारवर्गा च्या एकजुटीपासून आरंभ क रणेच योग्य होईल शेतकरी कामगार पक्षाने इंटरनॅशनल कम्युनिस्टांचा आदेश पाळण्याची प्रबंधात कामगारांचे लढे उभारण्याचे व एकजुटीचे धोरण उभारण्याचे प्रबंधात म्हटले व काही मागण्याही सरकारपुढे मांडल्या.

वरील सुचनेप्रमाणे कामगार वर्गाची एकजूट घडवून आणण्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत या दृष्टीने या कामगार वर्गाचा जो भाग समाजवादी पुढारीपणाखाली आहे. त्याला एकजुटीचे महत्व आपण सतत पटवून देत राहिले पाहिजे. या दृष्टीने समाजवादी कम्युनिस्ट, शे.का.प. इ.च्या पुढारपणाखाली असणाऱ्या कामगारांची एकजूट त्यांच्या दैनंदिन लढ्यातूनच होऊ शकेल. आजच्या परिस्थितीत कामगार वर्गाच्या मुलभूत मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

१. कामगारांना कमीत कमी ८० रु. महिना व कारकून, कुशल कामगार यांना १२५ रु महिना .

२. संपूर्ण प्रमाणात महागाई भत्ता.

३. कामाची शाश्वती आणि काम करण्याचा हक्क यांना मान्यता.

४. १ महिन्याची भरपगारी हक्काची रजा, २० दिवसाची भरपगारी कॅज्युअल लीव्ह व म्हातारपणी पेन्शन

५. बदली कामगार कायम करणे

६. ७ तासाचा दिवस व ४० तासांचा आठवडा

७. बेकारी विरुध्द शाश्वती

८. १९४८–४९ सालासाठी सर्व धंद्यात ४।। महिन्यांचा बोनस.

९. कामगार, शेतकरी, विद्यार्थी स्त्रिया यांच्या सर्व पुढाऱ्यांची मुक्तता त्याप्रमाणे शे.का.प कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष इ. पक्षांच्या कार्यकर्त्यांची मुक्तता.

१०. संपाच्या व ट्रेड युनियाच्या हक्कावर गदा आणणाऱ्या सर्व कायद्यांना विरोध कामगारवर्गाच्या एकजुटीवर कामगारवर्गाचे लोकशाही क्रांतीच्या मोर्चावर यश मिळवणे अवलंबून आहे व या यशावर जनतेची लोकशाही क्रांतीचे यश अवलंबून आहे.

**शेतकरी आघाडी**

हिंदुस्थान १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. येथे साम्राज्यशाही वसाहतिक अर्थव्यवस्था होती. स्वातंत्र्यानंतरही तशीच होती. शेतीव्यवसाय दिवसेदिवस भांडवलशाहीमुळे खालावत चालला होता, त्यामध्ये बदल केल्याशिवाय ती सुधारणार नाही. सरकार फक्त घोषणांशिवाय सुधारणा आणणे अशक्य आहे.

कॉमर्सच्या डिसेंबर १९४९ अंकात म्हंटले आहे की, वसाहती अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांची परिस्थिती नेहमी खालावतच जात असते. जमिनीचे तुकडे पडने, तिचा मगदूर कमी होणे , शेतकऱ्यांचे कर्ज वाढणे हे सर्व त्या अर्थव्यवस्थेचे परिणाम असतात. गेल्यावर्षी हिंदुस्थानात १८० कोटी रुपयाचे धान्य आणावे लागले.

हे लक्षात घेऊन शेतकरी कामगार पक्षाने शेतकऱ्यांच्या निरनिराळया चार स्तरामध्ये विभागणी करून त्यांची भुमिका वसाहतिक देशात सांगितली.

**१. शेतमजुर**

शे.का.पक्षाने या स्तराचे वर्णन स्वःतजवळ काहीही शेती नसलेला व केवळ दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करून पोट भरणारा असा वर्ग आहे. या वर्गाची संख्या दिवसे-दिवस वाढत आहे. शेतकऱ्यातील या सर्वात क्रांतीकारक स्तर आहे. कामगार वर्गाचा हा जोरदार दोस्त असतो. याचे हितसंबंध इतर शेतकरी वर्गाशी काही बाबतीत काहीसे विरोधक असल्याने या वर्गाच्या स्वतंत्र संघटना केल्या पाहिजेत आणि सर्वात शेतकरी वर्गाने महत्वाचे स्थान घेतले पाहिजे.

**२. गरीब शेतकरी**

शेतीच्या व्यवसायात दैंनदिन रोजी रोटी न भागल्याने यांना काही काळ मजुरी करावी लागते. पण हा शेतकरी वर्गातच मोडला जातो. लोकशाही क्रांती यशस्वी करण्यासाठी गरीब शेतकरी व शेतमजूर यांचा पुढाकार असतो.

**३. मध्यम शेतकरी**

स्वतःचे व आपल्या कुंटुंबाचे शेतीव्यवसायावर खर्च भागवणारी जमीन या स्तरातील शेतकऱ्यांकडे असते.त्याचे व शेतमजुरांचे संबंध थोडेफार विरोधी असतात. शे.का.प.ने या स्तराला जनतेच्या लोकशाही क्रांतीत कामगार वर्गाचा दोस्त असतो व यांना शेतमजुरांच्या पाठीमागे जाण्यातच त्यांचे हित आहे. ही गोष्ट या स्तराला पटवून दिली पाहिजे असे म्हटले आहे.

**४. श्रीमंत शेतकरी**

खेडेगावच्या -ग्रामीण भागातील याचे अर्थव्यवस्थेवर वर्चस्व असते व ती कायम ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. वसाहातिक अर्थरचनेमुळे पहिल्या काळात त्या चळवीवर या थराचे वजन असते. हे पुढारीपण शेतकरी चळवळीला घातक ठरणारे असते. म्हणून हे पुढारीपण नष्ट करणे जरुरीचे आहे. पण वसाहातिक अर्थव्यवस्थेमुळे शेतीच्या धंद्याची होणारी वाताहत व त्यातच आर्थिक आरिष्टाचे जबर ओझे यामुळे हैराण झालेल्या या स्तरातील बराच मोठा विभाग कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या लोकशाही क्रांतीला उपयोगी पडण्याचा संभव असतो. त्यापैकी पक्षाबरोबर येण्यास तयार असेल तेव्हा असेल

तेवढा विभाग शक्य तथपर्यंत बरोबर नेण्याचे योग्य ते प्रयत्न पक्षाने केले पाहिजेत. शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

१. मोबदला न देता जमीनदारी नष्ट करणे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे व तिची फेरवाटणी करणे.

२. उत्पादनाला लागणारा खर्च व सर्व साधारण नफ्याचा दर धान्यात घेऊन धान्याच्या किमती ठरवणे.

३. शेती धंद्याला व शेतकऱ्याला उपजीवीकेला लागणाऱ्या वस्तू त्याला परवडतील अशा भावात मिळण्याची व्यवस्था करणे.

४. कुळाला योग्य सरंक्षण मिळेल अशा रीतीने कुळ कायद्यात दुरुस्ती करणे.

५. जुने कर्ज रद्द करणे. शेतीच्या व्यवसायातील वेळोवेळी लागणारे कर्ज मिळवण्याची व्यवस्था करणे

**अस्पृश्य शेतमजूर व शेतकरी**

लोकशाही क्रांतीतील शेतकरी संघटनेला अडथला करणारी अस्पृश्यता ही एक प्रमुख सामाजिक परिस्थिती आहे.त्यासाठी शे.क्रा.पने प्रबंधात म्हटले की, अस्पृश्यता नष्ट करणे ही आपल्या पक्षाच्या चळवळीच्या दुष्टीने एक महत्वाची गोष्ट आहे. परंतु देवळात जाण्याची परवानगी देणे किंवा हॉटेले खुली करून अस्पृश्यता नष्ट होत नाही त्यासाठी अशा परिस्थितीत शेतमजुरांच्या युनियन्समध्ये व शेतकरी सभात अस्पृश्य शेतमजुर व शेतकरी यांना एकत्र आणण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला पाहिजे. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अस्पृश्य समाजाशी आधिक समरस होऊन त्यांना मार्क्सवादी बनवले पाहिजे . किसान-कामगारांना या अस्पृश्य किसान-कामगारांशी एकजूट करण्याचे शिक्षण देऊन धर्माच्या किंवा जाती श्रेष्ठत्वाच्या कल्पनेने भारल्यामुळे अस्पृश्य कामगारांना जो त्रास होतो तो पूर्णपणे बंद करण्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत.

अस्पृश्य समाजाला मार्क्सवादी विचारसरणी पटली तरी चार मुलांना नोकऱ्या मिळणे जरुर आहे आणि फक्त नोकऱ्यांनी या समाजाची सामाजिक, आर्थिक होणारी पिळवणूक

थांबणार नाही. ही त्यांच्या मनात भावना होऊन क्रांतीसाठी इतर गटांबरोबर एकजुटीसाठी उमेदीने पुढे येतील.

**विद्यार्थी**

लोकशाहीत विद्यार्थ्यांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. परंतू त्यांना ब्रिटीशांनी राजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी नंतर ही विद्यार्थ्यांवर फीचा बोजा, शिक्षणाचा खर्च अतिशय वाढलेला आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणापासूनही वंचित रहावे लागले व काही विशिष्ट वर्गानेच शिक्षणामध्ये वर्चस्व स्थापन केले. प्रबंधात विद्यार्थ्यांविषयीच्या धोरणात पक्ष म्हणतो कामगार, शेतकरी व गरीब मध्यम वर्गीयांची मुले फी वाढीमुळे अडाणी किंवा अर्धशिक्षीत राहिली तरच वरच्या वर्गाच्या हाती राज्ययंत्रातील महत्वाच्या जागा राहून त्यांचे पिळवणुकीचे काम सोपे जाणार आहे. त्यासाठी फीवाढीविरुध्द विद्यार्थी वर्गाचा लढा उभारणे अत्यंत जरुरीचे होऊन बसले आहे. त्याचबरोबर विद्यार्थी वर्गाला राजकीय परिस्थितीची जाणीव करून देऊन कामगार, शेतकरी व इतर श्रमजीवी जनतेच्या लढ्यात सामील करून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थी संघाप्रमाणेच ,बोर्डिंग, सहकारी सोसाट्या इ. मार्फत विद्यार्थ्यांना मदत करून त्यांना संघटित करण्याचे कार्यातही पक्षातील विद्यार्थी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

**स्त्री संघटना**

ग्रामीण व शहरी भागात हा निम्मा वर्ग आहे. व त्यांना आजपर्यंत दुय्यम भूमिकाच पार पाडण्याची जबाबदारी आलेली आहे. आपल्यातील स्त्री कार्यकर्त्यांनी संघटित करण्याचे कामाला लागले पाहिजे. त्यांना शेतकरी सभा व शेतमजूर संघात सामील करून घेतले पाहिजे. शहरातील व्यावसायिक संघटनातून संघटित केले पाहिजे. क्रांतीकारक चळवळीची पताका घेऊन बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांना प्रथम क्रांती आपल्या घरात करावी लागेल. त्याचप्रमाणे शेतकरी समाजातील हा जवळ-जवळ निम्मा भाग जर आपल्या चळवळीपासून दूर राहिला तर आपली लोकशाही क्रांती यशस्वी होणे कठीण जाणार आहे.

**मध्यम वर्ग**

ग्रामीण व शहरी भागात मध्यम वर्गात थोडीफार प्रमाणात जागृती असते. ग्रामीण भागातील शेतकरी समाजातून शिक्षण घेऊन नोकऱ्यांमध्ये सामील झालेला हा वर्ग आहे तर शहरी भागात या वर्गात बुध्दीजीवींचा जास्त भरणा असतो. प्रबंध म्हणून शे.का.प.ने त्यांच्या संघटना बांधण्याचे ठरविले होते.

प्राथमिक शिक्षक हा शेतकरी वर्गातून आलेला असल्याने त्याचा शेतकरी संघटनेला चांगला उपयोग होतो. त्यासाठी प्राथमिक शिक्षकांची संघटना प्रथम बांधली पाहिजे. शहरातील बुध्दीजीवींच्या व्यावसायिक संघटना करून त्यांच्या आर्थिक मागण्यांभोवती त्यांचे लढे निर्माण केले पाहिजेत. भांडवलशाही पूर्व पिळवणुकीवर आधारलेल्या धर्मामुळे प्राप्त झालेल्या जातीय श्रेष्ठतेमुळे ब्राह्मण जातीतील मोठा भाग, विभाग इतर जातींना कमी लेखून स्वतःच्या मोठ्यापणाच्या अंहकाराने भरलेला आहे. हा त्यांचा अहंकारच त्यांनी सोडणे जरुरीचे आहे. आजच्या जगात जातीय श्रेष्ठत्वाच्या कल्पना उराशी बाळगून ते आपला घातच करून घेत आहेत.या वर्गाच्या जातीय श्रेष्ठत्वावर हल्ला करणे म्हणजे ब्राह्मणांचा द्वेष करणे नव्हे. आपल्या पक्षाची भुमिका ही ब्राह्मण जातीतील श्रमजीवींना पटवून त्यांचे गैरसमज दूर करणे व त्यांना वर्गीय चळवळीत खेचणे हे पक्षाचे कर्तव्य आहे.

## मार्क्सवादावरील मुलभूत ग्रंथाचा अभ्यास

कोणत्याही पक्षाला जर क्रांतीकारक बनायचे असेल तर त्याचे तत्वज्ञानही क्रांतीकारक स्वरुपाचे असणे जरुरीचे आहे. परिस्थितीची भौतिक माहितीच्या आधारे कार्यक्रम आखताना क्रांतीकारक स्वरूपाचा असावा लागतो. व कार्यक्रम पूर्णपणे अंमलात आणणे जरुरीचे असते. त्यासाठी पक्षाचे कार्यकर्तेही क्रांतीकारक स्वरूपाचे असावे लागतात. मार्क्सवाद्याचे तत्वज्ञान क्रांतीकारक स्वरूपाचे होते. व त्यांची धोरण पत्करूनच चीन सारख्या देशात शेतकऱ्यांनी क्रांती केली होती. प्रबंधकर्त्यांनी दाभाडी येथे पक्षाला व कार्यकर्त्यांना मार्क्सवाद्याचे तत्वज्ञान याच स्वरुपाचे आहे हे सांगितले.

मार्क्सवादी तत्वज्ञान हे कामगारवर्गाचे क्रांतीकारक तत्वज्ञान आपण आत्मसात केले पाहिजे. त्यासाठी मार्क्स, एंजल्स, लेनिन, स्टॅलिन यांच्या ग्रंथाचा अभ्यास करणे जरूर आहे.

या कामगार वर्गाच्या महान पुढाऱ्यांनी जे कार्यदर्शन केले ते सर्व मार्क्सवादी पक्षांचा पाया आहे. या पुढाऱ्यांच्या मूलभुत ग्रंथावर आधारून वेळोवेळी जागतिक परिस्थितीत होणाऱ्या फरकाची दखल घेऊन आंतरराष्ट्रीय क्रांतीकारक संघटना-पूर्वी तिसरी इंटरनॅशनल व आता कॉमिनफॉर्म जगातील कम्युनिस्ट पक्षांना मार्गदर्शन करीत असते. या संघटनानी वेळोवेळी जे प्रबंध व ठराव पास केले तेही पक्षाने आत्मसात केले पाहिजेत. हे मुलभूत ग्रंथ व आंतरराष्ट्रीय संघटनेने प्रबंध व ठराव मुख्यतः मराठी भाषेत प्रसिध्द आहेत. त्याचा परिणाम मार्क्सवादी तत्वज्ञान हे इंग्रजी शिक लेल्या लोकांची एकप्रकारे मिरासदारी होऊन राहिली आहे. कम्युनिस्ट व समाजवादी पक्षाचे पुढारीपण मुलःत निरनिराळया तऱ्हेने मध्यमवर्गीय असण्याचे हेच कारण आहे. ही परिस्थिती पालटली पाहिजे. या मुलभूत ग्रंथाची मराठी भाषेत भाषांतरे करणे व ती सर्वसाधारण श्रमजीवी जनतेच्या स्वाधीन करणे जरुर आहे. असे केल्यानेच हे तत्वज्ञान आपण श्रमजीवी वर्गापर्यंत पोहचवू शकू असे पक्षाने प्रबंधात स्पष्ट केले. भाषांतराबरोबरच चळवळीच्या मार्गाने मार्क्सवाद जनतेपर्यंत नेणे जरुरीचे आहे. वेळोवेळी शिबिरे घेणे. आपल्या वर्तमानपत्रात शक्य तितक्या व शक्य तेव्हा या गोष्टी मांडणे याचा अवलंब पक्षाने केला पाहिजे

**कार्यकर्ते**

कोणत्याही पक्षाचे प्रमुख घटक साधन म्हणजे कार्यकर्ता असतो.कार्यकर्त्यांतूनच पक्ष वाढीस लागतो.कार्यकर्ते खंबीर व असंख्य तेवढे पक्षाची ताकद वाढत असते.कार्यकर्त्यांना पुढारपणाने तत्वज्ञान सांगणे जरुरी आहे. त्याचप्रमाणे जागृतीचे कार्य पक्षांचे अधिक असते व तो सर्व वर्गातून आलेला असणे जरुरीचे आहे.दाभाडी प्रबंधात पक्षाने कार्यकर्त्यांना महत्व देऊन तो तयार झाला पाहिजे असे म्हटले होते.

मार्क्सवादाच्या या शास्त्रीय अभ्यासाबरोबरच आजची सर्वात मोठी गरज पक्षाला कोणाची असेल तर ती .कार्यकर्त्यांची होय. मार्क्सवादाचा अभ्यास केलेले. मार्क्सवादी पध्दतीने काम करणारे कार्यकर्ते तयार करणे पक्षाची आजची मुलभुत घोषणा आहे.मार्क्सवादी पक्ष हा जनेतेचे पुढारीपण करणारा पक्ष असतो या दृष्टीने पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा त्या-त्या भागातील जनतेचे पुढारीपण घेण्यास लायक असणे अंत्यंत जरुर असते.कार्यकर्ते तयार

करताना स्त्री समाजातील कार्यकर्ते तयार करण्याकडेही पक्षाने लक्ष दिले पाहिजे. यासाठी कार्यकर्ते तयार करण्याचा प्रयत्न तातडीने झाला पाहिजे. त्यासाठी माध्यम शिबीराचे वापरले पाहिजे.

## २.७ पक्षाच्या कामाची पध्दत

ज्याप्रमाणे कोणत्याही पक्षाला,तत्वज्ञान, संघटना कार्यकर्ते आवश्यक असते व कामाच्या पध्दतीनुसार संघटना बांधण्याचे कार्य व कार्यकर्त्यांकडून काम करून घेणे जरुरीचे असते. कामाची पध्दत भौतिक, भौगोलिक परिस्थितीनुसार बदलणारी असते. शेतकरी कामगार पक्षानेही दाभाडी प्रबंधात पक्षाच्या कामाच्या पध्दतीविषयी विवेचन केले आहे. त्यांनी लोकशाही पध्दतीची आवश्यकता प्रकट केलली होती. लोकशाही पध्दतीमध्ये पक्षातंर्गत निवडणुकीसाठी सभासदांसाठी पदाधिकाऱ्यासाठी असणे आवश्यक असते. तसेच टीका, आत्मटीकेचे अधिकार लोकशाही वैशिष्ट्याने दिले आहेत.

लोकशाही पध्दतीने पक्षाच्या कामाची व मध्यवर्ती तत्वावर आधारलेली असली पाहिजे.लोकशाही पध्दतीने कार्यकर्ते तयार करणे व पक्षाच्या कामाला मार्क्सवादी पध्दत लावणे या दोन्ही परस्परावलंबी गोष्टी आहेत. चांगल्या कार्यकर्त्यांशिवाय पक्षाच्या कामाला मार्क्सवादी व्यवस्थेत स्वरुप येत नाही आणि मार्क्सवादी पक्षात काम केल्याशिवाय कार्यकर्ते तयार होत नाहीत, मार्क्सवादी पक्षाची पहिली आवश्यक गोष्ट योजनाबध्दता ही आहे. सभासदाने नेहमीच योजनाबध्द असले पाहिजे. लहर वाटली म्हणून एखादी गोष्ट करणे याला मार्क्सवादी म्हणत नाहीत. ती झाडून टाकण्याच्या अत्यंत कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. कामाला योजनाबध्द स्वरुप द्यावयाचे म्हणजे आपल्या कार्यकर्त्यांचीही विभागणी करावी लागते. कामाची व्यवस्थित विभागणी केली नाही तर पक्षाची प्रगती होणार नाही. पक्षाच्या खालच्या कमेट्यांनी वरच्या कमेट्यांना व वरच्या कमेट्यांनी खालच्या कमेट्यांना आपल्या कामाचे अहवाल सादर करणे जरुर आहे. पक्षाच्या कामाचा मुळ बिंदू सेल असला पाहिजे व सेलमार्फत नेहमी पक्ष जनतेशी संबंध ठेवीत असतो म्हणून सेलमार्फत काम करण्याची पध्दत आपण जितकी आत्मसात करु तितकी पक्षाला जास्त बळकटी येणार आहे. मार्क्सवादी पक्ष हा कामगार शेतकरी राज्य प्रस्थापित करण्यासाठी प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या

कार्यकर्त्यांचा पक्ष आहे म्हणून ही गोष्ट आवश्यक आहे.पक्षामध्ये अंतर्गत टीका या होत असतात. व त्यातून प्रगती होत असते. पक्षामध्ये कार्यकर्ते महत्वाचा घटक असतो. पक्षाच्या पडत्या काळात कार्यकर्त्यांचे महत्व अधिक असते. त्याचप्रमाणे जनतेला केंद्रबिंदू मानूनच कोणताही पक्ष वाटचाल करीत असते. त्यासाठी भांडवल हे अधिक महत्वाचे असते.

टीका व आत्मटीका हा मार्क्सवादी पक्षाचा गाभा आहे.केलेल्या चुकांचे विवेचन करणे,त्यावर टीका करणे यामुळेच मार्क्सवादी पक्षाची बळकटी वाढत असते. व्यक्तीचे पुढारपण नाहीसे करून पक्षाने, पक्षाच्या तत्वज्ञानाचे , पक्षाच्या धोरणाचे, पक्ष कार्यकर्त्यांच्या एकजुटीचे पुढारीपण जर श्रमजीवी जनतेला द्यावयाचे असेल तर टीका. आत्मटीका एवढाच एकमार्ग आहे. सोव्हीएट युनियन कम्युनिस्ट पक्षाची प्रगती याच मार्गाने झाली आहे. पक्षाचे काम झपाट्याने वाढविण्याच्या दृष्टीने कार्यकर्ते जनतेच्या निरनिराळया विभागात कामाला लावले पाहिजे. जिल्ह्याचे व तालुक्यांचे चिटणीस जर सर्व वेळ काम करणारे असतील तर त्यामुळे पक्षाच्या कामाला लवकर बळकटी येईल. दडपशाहीला तोंड देऊन पक्षसंघटना कायम ठेवण्याचे व बळकट करण्याचेही सर्व वेळ काम करणारे कार्यकर्ते तयार करण्याची जरुरी आहे. पक्षाच्या उभारणीत जनतेला फार मोठे स्थान आहे. पक्षाची उभारणी पैशाशिवाय अशक्य आहे. जनतेमधून पैसा मिळवणे हे पक्षसभासदाचे एक महत्वाचे काम असते. ज्या श्रमजीवी जनतेसाठी पक्ष कार्य करतो त्यांनीच पक्षप्रेमाने मदत केली पाहिजे.

प्रबंधानुसार पक्षाने कॉमिनकॉर्मच्या व मार्क्सवादी पुढारीपणाच्या नेतृत्वाखाली पक्षाने मार्गदर्शन घेतले. चीनच्या शेतकऱ्यांच्या क्रांतीचा आदर्श घेऊन कामगारांची व शेतकऱ्यांची दोस्ती करणे व भांडवलदार, साम्राज्यावाद्यांच्या , सरंजामशाहीविरुध्द लढण्यासाठी सर्व पक्षांची , वर्गांची,संघटनाची,गटांची एकजूट उभारणे हे प्रबंध जाहीर करतो. पिळवणूक होणाऱ्यांचा संयुक्त मोर्चा बांधून संघटित स्वरुपाचा लढा देण्याचे प्रबंधकर्त्यांनी स्वीकारले होते.लोकशाही क्रांतीद्वारे शेतकरी-कामगारांचे राज्य स्थापण्याचे उद्दीष्ट ठेवले. शेतकरी वर्गाची क्रांती ही महत्वाची मानली व कामगार क्रांतीला लोकशाहीच्या क्रांतीचा गाभा म्हटले आहे. प्रथम कामगार क्रांती करतात व तिचा शेवट शेतमजूर, गरिब व मध्यम वर्ग करतात असे प्रबंधात जाहीर केले. लोकशाहीचा कार्यक्रम प्रबंधकर्त्यांनी दिला. सर्व थरातील आघाड्यांचे कार्य सांगून त्याला मार्क्सवादाच्या ग्रंथाची विचारांची चालना दिली.लोकशाही

तत्वानुसार योजनाबध्द विभागणीवार पक्षाची रुपरेषा सादर केली.त्यासाठी सोव्हिएट रशियातील कम्युनिस्ट पक्षाचा आदर्श शे.का.प.ने मांडला. पक्षटीका-आत्मटीकेला महत्व देऊन पक्षाची उभारणी त्यातूनच होते हे ही स्पष्ट केले. त्याप्रमाणे कार्यकर्ते वर्तमानपत्र इ. महत्त्वाचे स्थान पक्षात दिले गेले. यावरून पक्षाने मार्क्सवादी विचारसरणी स्वीकारलेली दिसून येते. ४

परंतु दाभाडी प्रबंधाचे तत्वज्ञान, पक्षनेतृत्व सामान्य माणसाच्या गळी उतरविण्यास असमर्थ ठरले आहे असे म्हणता येईल. पक्षाने केलेले विवेचन, दुष्टीकोन शास्त्रीय आहेत. परंतु त्यानुसार प्रत्यक्षात अंमलबजावणी होऊ शकली नाही. शेतकरी कामगार पक्षामुळेच मार्क्स, लेनिन यांची नावे सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहचले.शेतकऱ्यांना संघटित करणे ही कामगिरी निश्चीतच केली आहे. सत्ता हाती नसताना समाजाची आमुलाग्र सुधारणा करता येणार नाहीच. शेतकरी वर्ग संघटित केल्याचा प्रभाव काँग्रेसचे अध्यक्ष के.कामराज यांच्यावरही पडला होता. १९२५ मध्ये कामराज शे.का.प. बद्दल म्हणाले होते की महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाने खेड्यापाडयांपर्यंत कसे जावे आणि त्या जनतेतून नेतृत्त्व कसे निर्माण करावे याचा मार्ग आम्हाला दाखवला आहे . आम्ही (काँग्रेसने) सुध्दा तसेच काम केले पाहिजे.५

# संदर्भसुची


१. भोळे भा.ल.- भारतीय शेतकरी कामगार पक्ष (स्वातंत्र्य ते संयुक्त महाराष्ट्र) अप्रकाशित शोधनिबंध,नागपूर विद्यापीठ नागपूर १९ , पृष्ठ क्र.८३ ते ८५

२. मोरे शंकरराव भारतीय शेतकरी कामगार पक्ष आढावा व आराखडा, प्रकाशक- बाबासाहेब देसाई,श्री.मुरारी मुद्रणालय कोल्हापूर १३ मे.१९८८
पृष्ठ नं. ७९ ते ८१

३. भोळे भा.ल.- उनि पृष्ठ क्र. ९२,९३

४. भाई देसाई बाबासाहेब- भारतीय शेतकरी कामगार पक्ष राजकारण उपरोक्त दाभाडी येथे भरलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात मंजूर झालेल ठराव,पृष्ठ क्र. ६ ते ६५, व्यंकटेश प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर १८-१-१९८३
पृष्ठ . ६ ते ६५

५ फडणीस जगन - शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब प्रकाशन, फेब्रुवारी १९७८ पुष्ठ ४९